। धाराशिव । वर्ष २५ वे । अंक २३५ वा । सोमवार दिनांक ०१ डिसेंबर, २०२५ । पृष्ठे ६ । किंमत ०१ ₹

RNI MAHMAR/2003/11649

# लातूर समाचार

(सांज दैनिक)
प्रकाशन: धाराशिव (उस्मानाबाद आवृत्ती)
पोष्ट परवाना L2/RNP/OMD- 52/24-26

dainiklatursamachar@gmail.com
संस्थापक : स्व. शंकर माधव जडे (स्वातंत्र्य सैनिक)

## क्राईम न्युज

### निष्काळजीपने अग्नी प्रज्वलीत करणाऱ्यांवर गुन्हे दाखल

परंडा (प्रतिनिधी)- पोलीस ठाणे अंतर्गत सार्वजनिक रस्त्याकडेला हातगाड्यावरील शेगडीवर निष्काळजीपने अग्नि प्रज्वलीत कणाऱ्यांवर परंडा पोलीसांनी दि. २८ नोव्हेंबर रोजी कारवाई केली. सिरसाव ता. परंडा जि. धाराशिव येथील ग्रामस्थ- बालाजी यांनी भुम ते वारदवाडी फाटा जाणारे रोडलगत हॉटेल स्वामी मध्ये शेगडीवर निष्काळजीपने अग्नि प्रज्वलीत करुन पदार्थ तयार करत असताना परंडा पोलीसांना मिळून आले. यावरुन पोलीसांनी सरकारतर्फे दिलेल्या प्रथम खबरेवरुन नमूद व्यक्तींविरध्द भा.न्या.सं. कलम- २८७ अन्वये परंडा पो.ठा. येथे गुन्हा नोंदवण्यात आला आहे.

### अवैध गुटखा विक्रीसाठी जवळ बाळगणाऱ्यावर गुन्हा दाखल

उमरगा (प्रतिनिधी)-पोलीस ठाणे अंतर्गत सुलेमान रा. काळे प्लॉट उमरगा ता. उमरगा जि. धाराशिव यांनी दि.२८.११.२०२५ रोजी आई साहेब मंगल कार्यालयाचे पाठीमागे एस टी कॉलनी उमरगा येथे महाराष्ट्रात शासनाचे प्रतिबंधीत केलेला गुटखा व तत्सव पदार्थ विमल पान मसाला,व्ही-१ टोबॅको असा एकुण १४,६४० किंमतीचे विक्री करीता जवळ बाळगलेला उमरगा चे पथकास मिळून आला. यावरुन पोलीसांनी गुटखा साहित्यासह जप्त करुन नमूद व्यक्तींविरुध्द भा.न्या.सं. कलम- १२३, २२३, २७५ सह अन्न सुरक्षा व मानके कायदा कलम ५९ अन्वये उमरगा पो ठाणे येथे गुन्हा नोंदवला आहे.

### गंभीर जखमी होऊन मृत्यू

भुम(प्रतिनिधी)- पोलीस ठाणे अंतर्गत नामे- शुभम , रा. सोनेगाव ता. जामखेड जि. अहिल्यानगर हे दि.२४.११.२०२५ रोजी ०९.०० वा.पुर्वी मोटरसायकल क्र एमएच १६ डीयु ९२५७ वरुन जात होते. दरम्यान पाथरुड ते भुम जाणारे रोडवर जयमल्हार हॉटेल जवळ बावी शिवारात मयत नामे शुभम शिंदे यांनी त्याचे ताब्यातील मोटरसायकल ही चालवून अपघात झाला. या अपघातात शुभम शिंदे हे गंभीर जखमी होवून मयत झाले. अशा मजकुराच्या फिर्यादी नामे-अजित बाळासाहेब मोरे, नेमणुक पोलीस ठाणे भुम यांनी दि.२८.११.२०२५ रोजी दिलेल्या प्रथम खबरेवरुन भुम पो ठाणे येथे भा.न्या.सं. कलम २८१, १०६ सह १८४ अन्वये गुन्हा नोंदवला आहे.

### मोटारसायकलची चोरी

धाराशिव (प्रतिनिधी)- ग्रामीण पोलीस ठाणे अंतर्गत फिर्यादी नामे- विजय भागवत नलावडे, वय ३७ वर्षे, रा. येडशी ता. जि. धाराशिव यांची अंदाजे ३०,००० किंमतीची मोटरसायकल रोजी रामलिंग मंदीर कमानी समोर येडशी येथुन अज्ञात व्यक्तीने चोरुन नेली. अशा मजकुराच्या फिर्यादी विजय नलावडे यांनी दि.२६.११.२०२५रोजी दिलेल्या प्रथम खबरेवरुन धाराशिव ग्रामीण पो ठाणे येथे गुन्हा नोंदवला आहे.

## फुले यांच्यामुळेच आज स्त्रिया अग्रस्थानी: दलीप ढोबळे



उमरगा(प्रतिनिधी)- स्त्री शिक्षणाची सुरुवात महात्मा फुले यांनी केली म्हणून आज सर्वच क्षेत्रात महिला अग्रस्थानी आहेत. भारताच्या पहिल्या महिला राष्ट्रपती प्रतिभाताई पाटील व द्रौपदी मुर्मू यांच्या सारख्या महिलांनी देशाचे प्रतिनिधित्व केले. हे स्त्री शिक्षणामुळेच शक्य झाले. ज्योतिबा फुले हे अंधश्रद्धा, जातिभेदाविरुद्ध आणि स्त्रियांच्या शिक्षणासाठी लढा देणारे महान समाजसुधारक होते. त्यांनी समाजाला शिक्षणाचे महत्त्व पटवून दिले. मुलींना आणि गरीब शोषितांना हक्क मिळवून दिले. विधवांना समाजात तितक्याच हक्काने आणि सन्मानाने जगायला शिकवले, असे प्रतिपादन दिलीप ढोबळे यांनी केले.

ते उमरग्यातील डॉ. कुशाबा धोंडिबा शेंडगे सीबीएसई स्कूलमध्ये सत्यशोधक समाजाची स्थापना करणारे महात्मा ज्योतिबा फुले यांच्या पुण्यतिथीनिमित्त अभिवादन केले. या वेळी संस्था अध्यक्ष डॉ. सचिन शेंडगे, प्रा. गोरख घोडके, अशोक दुधभाते, मुख्याध्यापिका आशा चोकडा व सर्व समन्वयकांची उपस्थिती होती. मान्यवरांच्या हस्ते फुले यांच्या प्रतिमेचे पूजन केले. त्यानंतर इयत्ता सातवीतील सयॉन बैन व असावरी गव्हाळे या विद्यार्थ्यांनी फुले यांच्या जीवन कार्याविषयी भाषणातून मुलांना माहिती दिली. सूत्रसंचालन निधी साळुंखे व अक्षरा केशवशेट्टी तर आभार तेजस माशाळकर या विद्यार्थ्यांनी व्यक्त केले.

## लोहाऱ्यात पाणी फाउंडेशनच्या ‘सत्यमेव जयते फार्मर कप’ उपक्रमांतर्गत प्रशिक्षण



लोहारा(प्रतिनिधी)- रब्बी हंगामातील राष्ट्रीय पोषण अभियान व अन्नधान्य योजना कडधान्यअंतर्गत हरभरा, रब्बी ज्वारी व मका पिकांच्या शेतकरी प्रशिक्षण आयोजित करून पीक पद्धती बद्दल, कीड व रोग नियंत्रण, उत्पादन पद्धती याबद्दल शेतकऱ्यांनी खबरदारी घ्यावी. ज्यातून शेतकऱ्यांचे उत्पादन वाढावे, अशी माहिती उपस्थित शेतकऱ्यांना देण्यात आली.

लोहारा पंचायत समिती सभागृहात कृषी विभाग, आत्मा व पाणी फाउंडेशन यांच्या विद्यमाने ‘सत्यमेव जयते फार्मर कप’ उपक्रमांतर्गत शुक्रवारी (दि. २८) प्रशिक्षण कार्यक्रम आयोजित केला होता. शेती, पाणी संवर्धन व ग्रामविकास या विषयांवर आधारित या प्रशिक्षणाला तरुण शेतकरी, प्रगतशील शेतकरी, ग्रामस्थ, कृषीताई, कृषी सखी मोठ्या संख्येने उपस्थिते होते.

या कार्यक्रमाला जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी राजकुमार मोरे, मंडळ कृषी अधिकारी माळकुंजे, महेश फावडे, रवी बनजगोळे यांची प्रमुख उपस्थिती होती. सहभागी शेतकऱ्यांनी प्रशिक्षणादरम्यान विविध शंका उपस्थित करून मार्गदर्शन घेतले. प्रास्ताविक तालुका कृषी अधिकारी महेश देवकाते यांनी केले. त्यांनी ‘फार्मर कप’ उपक्रमाची माहिती देत त्यामागील उद्दिष्टांची रूपरेषा मांडली. प्रशिक्षणात पाणी फाउंडेशनचे मास्टर ट्रेनर वैभव सुरवसे, मास्टर ट्रेनर प्रतीक्षा आसबे, युवराज निंबाळकर यांनी माती-जल संवर्धन, शाश्वत कृषी तंत्रज्ञान, जलसंधारण संरचना, शेततळे, समूह सहभाग व स्पर्धेचे नियम या विषयांवर तर कृषी विभागाचे महाविस्तार एआय ॲप डाउनलोड व वापराबाबत शेतकऱ्यांना सहायक कृषी अधिकारी शैलैश जट्टे यांनी मार्गदर्शन केले. या वेळी शेतकरी, शेतकरी गट, शेतकरी उत्पादक कंपनी यांनी मिळून २६० जण उपस्थित होते. पावसाचे पाणी योग्य पद्धतीने अडवल्यास भूजल पातळीत वाढ पावसाळ्यात मोठ्या प्रमाणात पाऊस होतो. मात्र उन्हाळ्यात पाण्यासाठी वणवण भटकावे लागते. पावसाच्या पाण्याचे योग्य नियोजन करून अडवल्यास भूजल पातळीत वाढ होणे शक्य आहे. पिकांच्या उत्पादनात सुधारणा होईल. पशुधनासाठी पाणी उपलब्ध होईल. गावाच्या सर्वांगीण विकासासाठी बळ मिळेल, असे मार्गदर्शन शेतकऱ्यांना देण्यात आला.

## मुलींना सुवर्ण तर मुलांच्या संघाला रौप्य पदक: ठाणे येथील १४ वर्ष वयोगटातील शालेय राज्यस्तरीय स्पर्धेत धाराशिवच्या संघाचे यश



कळंब (प्रतिनिधी)- ग्रामीण भागातील मुली सुद्धा विविध खेळात वेगळा ठसा उमटवत आहेत. रग्बी स्पर्धेत धाराशिव मुलींच्या संघाला सुवर्ण तर मुलांच्या संघाला रौप्य पदक पटकावले आहे. ठाणे येथे १४ वर्ष वयोगटातील शालेय राज्यस्तरीय स्पर्धा संपन्न झाल्या या स्पर्धेत धाराशिव मुलींच्या संघाने पहिल्या सामन्यात, मुलींनी पुणे विभाग या संघावर मात करून ५-० असा विजय मिळवला तर उपांत्य फेरीत छत्रपती संभाजी नगर या बलाढ्य संघावर चुरशीची लढत देत ५-० असा विजय मिळवून अंतिम फेरीत प्रवेश केला. तेथे नागपुर विभाग संघावर १५-० ने विजय मिळवत लातूर विभागाचे नेतृत्व करणाऱ्या धाराशिव जिल्ह्यातील जि. प. प्रशाला ईटकुर संघाने सुवर्ण पदकावर आपले नाव कोरले आहे. त्याचप्रमाणे मुलांचा पहिला सामना छत्रपती संभाजी नगर विभाग अशा बलाढ्य संघाबरोबर ५-० ने विजयी मिळवुन उपांत्य फेरी प्रवेश केला मुंबई विभागाला १०-० ने पराभूत करून बलाढ्य अशा कोल्हापुर विभागाबरोबर चुरशीची लढत देत लातूर विभागातील धाराशिव जिल्ह्यातील धरणग्रस्त माध्यमिक उच्च माध्यमिक विद्यालय लोटा (पूर्व )या संघाला रौप्य पदकावर समाधान मानावे लागले विजयी संघातील खेळाडुंना अनिल शिंदे, शरद गव्हार,राजाभाऊ शिंदे, निलेश माळी, संजय मडके ,सचिन तापकीरे यांचे मोलाचे मार्गदर्शन लाभले. या यशाबद्दल क्रीडाअधिकारी श्रीकांत हरनाळे, क्रीडा अधिकारी कैलास लटके, क्रीडा अधिकारी बी.के. नाईकवाडी, क्रीडा अधिकारी शितल शिंदे, शिल्पा डोंगरे,लक्ष्मण मोहीते , संजय घुले, सरस्वती वायबसे , सुनंदा चव्हाण, व सर्व पदाधिकारी व क्रीडा क्षेत्रातील मान्यवर यांनी खेळाडूंना शुभेच्छा देऊन अभिनंदन केले.

विजयी संघातील खेळाडू मुली : कर्णधार आश्वीनी वाघमारे, गौरी वैरागे, मयुरी आवाड, भांडे कृष्णा, जान्हवी राऊत, रिया आडसुळ, समिक्षा माळकर, आर्या बावळे, प्रिया डोंगरे, पुर्वी खामकर, नेहा सिरसट, सिद्धी पावले मुले : कर्णधार ज्योतीराम निवळकर, प्रथमेश सुरवससे, पवार श्रवण, शिवतेज गव्हार, हर्षद माळकर, स्वराज अभंग, विजय गायकवाड, रोहन दहिरे, सोहम काळे, विराज डोंगरे, आकाश माळकर, विराज झाडके

## दहिफळ येथे खंडोबा यात्रा महोत्सव

### गौरच्या लखनने शिराढोणच्या विजयला केले चितपट: मल्लांनी मैदान गाजवले



येरमाळा(प्रतिनिधी)- कळंब तालुक्यातील दहिफळ येथील श्री खंडोबा यात्रा महोत्सवाच्या निमित्ताने कुस्ती स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. या स्पर्धेसाठी विविध ठिकाणाहून २०० हून अधिक मल्लांनी सहभाग घेतला. अंतिम कुस्तीच्या लढतीत लखन लंगडे (गौर) आणि विजय ठोंबरे (शिरढोण) यांच्यात अटीतटीची लढत झाली, यामध्ये लखन लंगडे यांनी विजय मिळवला.

कुस्ती स्पर्धेचे उद्घाटन पंचकमेटी व गावातील चिमूकल्यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी यात्रा महोत्सव समितीचे अध्यक्ष अभिनंदन मते, समाधान मते, सरपंच चणेश्वर पाटील, सुधीर मते, पोपट पाटील, अमरसिंह मते, किरण भातलवंडे यांच्यासह ग्रामस्थ उपस्थित होते. यात्रा समितीने या स्पर्धेसाठी ३००,००० रुपयांचा निधी मंजूर केला होता. स्पर्धेतील लहान गटातील कुस्त्या आणि मोठ्या कुस्त्यांमध्ये विविध तालुक्यातील मल्लांनी सहभाग घेतला. मोठ्या कुस्त्यांसाठी ५ कुस्त्यांना ११,००० रुपये आणि २० निकाली काढलेल्या कुस्त्यांना ५,००० रुपये दिले गेले. लखन लंगडे गौर, विजय ठोंबरे शिरढोण, राम दडपणे, दत्ता मेटे यांच्यात अटीतटीच्या लढतींनी दहीफळ येथील मैदान गाजवले. स्पर्धेच्या निष्पक्ष आयोजनासाठी पंच सदस्य बालाजी मते, हरीचंद्र भातलवंडे, वाल्मीक माने, अंकुश कुटे, गोपीनाथ मते व इतर तीन वस्ताद यांनी महत्त्वपूर्ण भूमिका बजावली. दरम्यान या कुस्ती स्पर्धेने खंडोबा यात्रा महोत्सवाची सांगता झाली असे संयोजकांनी सांगितले. रात्री उशिरापर्यंत फड रंगला होता.

दहिफळ येथील यात्रामहोत्सवाला १५० वर्षांची परंपरा, आजतागायत सुरू आहेत विधी दहिफळ येथील श्री खंडोबा यात्रा महोत्सव सुमारे दीडशे वर्षांपासून पारंपारिक पद्धतीने साजरा केला जात आहे. शासकीय निधीच्या अभावात आणि वस्ताद नसल्यानाही गावकऱ्यांनी स्वतः च्या मदतीने यात्रा महोत्सवाचा उत्साह जपला आहे. त्यासाठी तीन लाख रुपयांचा निधी राखून ठेवला आहे. या महोत्सवामध्ये कुस्ती, सांस्कृतिक कार्यक्रम आणि लोककला मोठ्या उत्साहाने साजरे केल्या जातात.

## आर. पी. कॉलेज ऑफ फार्मसीमध्ये ‘ओरिएंटेशन व फ्रेशर्स पार्टी’ उत्साहात संपन्न!



धाराशिव (प्रतिनिधी)- डॉ. वेदप्रकाश पाटील शैक्षणिक संकुल, गडपाटी, धाराशिव येथील आर.पी.कॉलेज ऑफ फार्मसी महाविद्यालयामध्ये (ठ. झ. उेश्रश्रशसश ेष झहरीरलू) नुकतेच डी. फार्मसी, बी. फार्मसी व एम. फार्मसी प्रथम वर्षातील विद्यार्थ्यांसाठी ओरिएंटेशन व फ्रेशर्स पार्टीचे भव्य आयोजन करण्यात आले होते. डॉ. प्रतापसिंह जी पाटील साहेब यांच्या मार्गदर्शनाखाली हा कार्यक्रम उत्साहात संपन्न झाला.

या कार्यक्रमाला शासकीय आयुर्वेदिक महाविद्यालय, धाराशिव येथील रोगनिदानशास्त्राचे विभाग प्रमुख डॉ. मयूर देशमुख व रामकृष्ण परमहंस महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. संदीप देशमुख यांची प्रमुख उपस्थिती लाभली.

महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. शेख गाझी यांनी प्रास्ताविक करताना नवीन प्रवेशित विद्यार्थ्यांना शुभेच्छा देऊन महाविद्यालयाविषयी सविस्तर माहिती दिली.

यावेळी मार्गदर्शन करताना डॉ. मयूर देशमुख यांनी विद्यार्थ्यांशी संवाद साधत त्यांना केवळ 'एंड यूजर' न बनता, संशोधनाविषयी आवड निर्माण करून 'औषध मेकर्स' (ऊींस चरज्ञशीी) बनण्याचे मोलाचे आवाहन केले.

यासोबतच, प्राचार्य डॉ. संदीप देशमुख सरांनी औषध निर्माण क्षेत्रातील नवनवीन संधी ओळखून विद्यार्थ्यांनी स्वतःचं व देशाचं नाव उज्ज्वल करावे, असे आवाहन करत त्यांच्या पुढील शैक्षणिक वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

नपर सत्रानंतर फ्रेशर्स पार्टीला सुरुवात झाली. नवीन प्रवेशित विद्यार्थ्यांसाठी विविध मनोरंजक गेम्सचे आयोजन करण्यात आले होते. या गेम्समध्ये सहभागी होऊन विद्यार्थ्यांनी आपला उत्साह दाखवला. या स्पर्धेतून मिस्टर फ्रेशर्स आणि मिस फ्रेशर्स या पुरस्कारांसाठी विजेत्या विद्यार्थ्यांची निवड करण्यात आली.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन कु. मधुलक्ष्मी थोरात, कु. स्नेहा गरड, कु. मंदार माने व कु. सिद्धी विभुते यांनी प्रभावीपणे केले. या उत्साही कार्यक्रमाला महाविद्यालयातील बी. फार्मसी, डी. फार्मसी व एम. फार्मसीचे सर्व विद्यार्थी आणि पालक मोठ्या संख्येने उपस्थित होते. हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी सर्व प्राध्यापक व प्राध्यापक इतर कर्मचाऱ्यांनी परिश्रम घेतले.

## रहदारीस धोकादायरीत्या वाहन उभे करणाऱ्यांवर गुन्हे नोंद

धाराशिव (प्रतिनिधी)- ग्रामीण पोलीस ठाणे अंतर्गत नंदकुमार रा. जवळे दु. कसबे तडवळे ता. जि.धाराशिव,अरविंद रा.हदगाव ता. कळंब जि. धाराशिव यांनी दि.२८.११.२०२५ रोजी आपआपल्या ताब्यातील अनुक्रमे रिक्षा क्र एमएच २३ ई ९५१४, रिक्षा क्र एमएच २५ एम १४१० हे येडशी बसस्थानका कडे जाणारे रोडवर सार्वजनिक रस्त्यावर रहदारीस धोकादायकरीत्या उभे केलेले असताना धाराशिव ग्रामीण पोलीसांना मिळून आले. यावरुन पोलीसांनी सरकारतर्फे दिलेल्या प्रथम खबरेवरुन नमूद व्यक्तीविरुध्द भारतीय न्याय सहिंता कलम २८५ मोवाका अन्वये धाराशिव ग्रामीण पो.ठा. येथे स्वतंत्र २ गुन्हे नोंदवले आहेत. पोलिस अधिक तपास करीत आहेत.

ओ३म् भूर्भुव: स्व: ।
तत्सवितुर्वरेण्यं भर्गो देवस्य धीमहि ।
धियो यो न: प्रचोदयात् ।।

# लातूर समाचार

## सिंध परत मिळेल ?

पाकिस्तानातील घटना ह्या समाधानकारक नाहीत कारण पाकिस्तानचे माजी पंतप्रधान इम्रान खान रावळपिंडी येथील कारागृहात शिक्षा भोगत आहेत. त्यांची कारागृहात हत्या करण्यात आल्याचे वृत्त 'अफगाण टाइम्स' दैनिकाने प्रसिद्ध केल्यावर कारागृहाबाहेर अजूनही प्रचंड मोठे आंदोलन केले जात आहे. कारागृहाने इम्रान खान यांची प्रकृती उत्तम असल्याचे निवेदन प्रसारित केले असले, तरी त्यांचा व्हिडिओ, छायाचित्र किंवा निवेदन प्रसारित केलेले नसल्याने कारागृह प्रशासनावर कुणीही विश्वास ठेवलेला नाही. इम्रान खान यांच्या बहिणीने त्यांची हत्या झाल्याचा संशय व्यक्त केला आहे. दुसरीकडे गेल्या काही महिन्यांपासून पाकच्या खैबर पख्तूनख्वा प्रांतात तेहरीक-ए-तालिबान पाकिस्तान या संघटनेने हा प्रांत अफगाणिस्तानचा असल्याचे सांगत तेथे पाकच्या सैन्यावर आक्रमणे चालू ठेवलेली आहेत. बलुचिस्तानमध्ये गेल्या ८० वर्षांपासून पाकपासून स्वतंत्र होण्यासाठी सशस्त्र आंदोलन चालू आहे. त्यातच गेल्या अनेक वर्षांपासून पाकच्या सिंध प्रांतालाही स्वतंत्र सिंधुदेश बनवण्याची मागणी चालूच आहे. त्याला आता भारताचे संरक्षणमंत्री राजनाथ सिंह यांनी 'सिंध परत भारताला मिळू शकते', अशा प्रकारचे विधान केल्याने यावर पुन्हा चर्चा चालू झाली आहे. भारतामध्ये कदाचित् राजनाथ सिंह हे पहिलेच संरक्षणमंत्री असतील, ज्यांनी स्वातंत्र्यानंतर सिंधुदेश भारतात आणण्याविषयीचे विधान केले असेल. पाकिस्तानच्या राजकीय वर्तुळातही अस्वस्थता निर्माण झाली आणि सिंध विधानसभेने या विधानाचा निषेध करणारा ठरावही केला. त्यामुळे पाकच्या परराष्ट्र मंत्रालयाने याला 'भारतातील हिंदुत्वनिष्ठ मानसिकता' म्हटले. पाकला असे म्हणणे आवश्यकच असणार आहे; मात्र सिंध असो, बलुचिस्तान असो किंवा खैबर पख्तूनख्वा असो सर्वांना पाकपासून स्वतंत्र व्हायचे आहे, ही वस्तूस्थिती आहे, हे लक्षात घ्यायला हवे. सिंध हा उपखंडातील असा भूभाग आहे, ज्याचे महत्त्व आजच्या राजकीय सीमांपलीकडे जाते. सिंधु नदीच्या खोऱ्यातील हडप्पा-मोहेनजोदडो ही प्राचीन नगरे हे दाखवतात की, इथली संस्कृती किमान ५ सहस्र वर्षे जुनी आहे. वैदिक साहित्यानुसार सप्त-सिंधु म्हणजे सात नद्यांचा प्रदेश, हीच भारतीय संस्कृतीची जन्मभूमी मानली जाते. इतिहासात सिंध अनेक साम्राज्यांचा भाग राहिला, ज्यात मौर्य, शक, अरब पठाण, मोगल आणि ब्रिटीश यांचा समावेश आहे. सिंधमधील सिंधु नदी भारताची मूळ ओळख आहे. 'हिंदु' हा शब्द 'सिंधु'वरूनच निर्माण झाला, हा इतिहास आहे. सिंधु नदीच्या परिसरात जीवन उभे राहिले; कृषी आणि शहरी संस्कृती जन्मली. स्वातंत्र्यवीर सावरकरांच्या विचारांनुसार सिंध म्हणजे हिंदु संस्कृतीची उत्तर सीमेची रेषा ! सावरकरांनी त्यांच्या 'हिंदुत्व' या ग्रंथात अत्यंत स्पष्टपणे म्हटले, 'आसिंधु सिंधुपर्यंतची (सिंधु नदीपासून सिंधु सागरापर्यंतची) ही भूमी पितृभू आणि पुण्यभू आहे.' सावरकरांसाठी सिंध हा केवळ भूभाग नव्हता; तो भारतीय ओळखीचा पाया होता. सिंधु नदी हे हिंदूंच्या अस्तित्वाचे प्रतीक आहे. सावरकरांची कल्पना भौगोलिक नसून सांस्कृतिक होती. भारताची सीमा नदीने ठरली नव्हती, तर सामूहिक चेतना, इतिहास आणि ओळखी यांनी ठरली होती. पाकमध्ये लोकशाही कधी रूजलीच नाही. नेहमीच सैन्याचा अधिकार राहिलेला आहे आणि आताही सैन्यच देश चालवत आहे. सरकार बुजगावणे आहे. पाकच्या सैन्यात पंजाबचे वर्चस्व आहे. त्यामुळे संपूर्ण पाकवर पंजाबी मुसलमानांचे वर्चस्व असल्याने अन्य प्रांतांना तुच्छ आणि दुय्यम ठरवण्यात आले आहे. त्यांच्याशी सापत्नभावाचा व्यवहार केला गेला आहे आणि चालू आहे. पाकचा सर्वाधिक खर्च पंजाबवर केला जातो. यामुळे अन्य प्रांतांमध्ये असंतोष आणि खदखद आहे. सिंधसाठी आणखी एक कारण म्हणजे सिंधमध्ये मोठ्या प्रमाणात भारतातून गेलेले मुसलमान रहात आहेत. तेथे त्यांना 'मुहाजिर' म्हटले जाते. या मुसलमानांना तेथे तुच्छ लेखले जाते. यातूनच सिंध प्रांतातील लोकांना स्वतंत्र व्हायचे आहे. विशेष म्हणजे पाकमध्ये जे काही हिंदू शेष राहिले आहेत, तेही सिंध प्रांतात सर्वाधिक आहेत. सिंधु नदीचे किंवा उत्तरेकडून येणारे पाणीही पंजाब ७० टक्के प्रमाणात वापरतो आणि सिंधला उर्वरित पाणी सोडतो. त्यामुळे सिंधमधील शेतीची हानी होत आहे. पाकिस्तानची आर्थिक राजधानी कराचीसुद्धा सिंध प्रांतात येते. पाकला येथून ६० टक्के महसूल मिळत असतो, त्या तुलनेत सिंधला त्याचा लाभ मिळत नाही. यामुळे येथे स्वतंत्र सिंधची मागणी होत आली आहे. 'राजनाथ सिंह यांच्या विधानानंतर पुन्हा त्याला उचल मिळू शकते', असे म्हटले जात आहे. इंदिरा गांधी पंतप्रधान असतांना सिंधमधील अशा विचारांचे नेते गांधी यांच्या संपर्कात होते. जर गांधी यांची हत्या झाली नसती, तर कदाचित् सिंध वेगळा होण्यासाठी प्रयत्न अधिक तीव्र झाले असते. हा प्रश्न अनेकांच्या मनात आहे. भावनेने विचार केला, तर सिंधचे सांस्कृतिक नाते असल्याने त्याला भारताशीच जोडायला हवे, असेच उत्तर असेल; परंतु राजकीय वास्तव वेगळे आहे. सिंध आज पाकिस्तानचा घटनात्मक भाग आहे. तिथे अद्याप स्वतंत्र सिंधुदेशासाठी जनसमर्थन पूर्णपणे प्रभावी नाही. आंतरराष्ट्रीय कायदे आणि भू-राजकीय समीकरणे अशा पालटास अडचणीचे ठरतात. भारत-पाक संबंध आधीच नाजूक आहेत; भूभागीय पालट अवघडच आहे. राजनाथ सिंह यांचे विधान सांस्कृतिक सत्यावर आधारलेले आहे, भू-राजकीय अपेक्षेवर नाही. त्यांनी म्हटले, 'कधी काय होईल सांगता येत नाही.' जर 'कधी काय होईल ?', असे म्हटले, तर सिंध भारतात येऊ शकतो किंवा भारताच्या पाठिंब्याने तो स्वतंत्र देश होऊ शकतो. 'स्वतंत्र देश रहाणे सिंधला किती शक्य असू शकणार?', हाही प्रश्नच आहे. त्याला भारताशी जोडणे हाच एकमेव पर्याय असू शकतो. त्यासाठी भारत पुढाकार घेणार आहे का ? राजनाथ सिंह यांचे विधान पहाता भारत तसा का विचार करत आहे का ? हे ठाऊक नाही. स्वातंत्र्याच्यावेळी ज्या चुका झाल्या त्याचे भोग भोगावे लागत आहेत हे नक्की!

# दररोज रिकाम्या पोटी एक चमचा तूप खाल्ल्याने काय होते? जाणून घ्या जबरदस्त फायदे

तूप हे शतकानुशतके आपल्या आहाराचा एक भाग आहे. अनेक पोषक तत्वांनी समृद्ध असलेले तूप आरोग्यासाठी खूप फायदेशीर आहे. म्हणूनच ज्येष्ठांपासून ते आरोग्य तज्ज्ञांपर्यंत सर्वजण ते आहाराचा भाग बनवण्याची शिफारस करतात.

परंतु, तुपाबाबत लोकांच्या मनात अजूनही अनेक प्रश्न आहेत. अशा परिस्थितीत, आज या लेखात आम्ही तुम्हाला दररोज सकाळी रिकाम्या पोटी एक चमचा देशी तूप खाण्याचे फायदे सांगणार आहोत..

दररोज रिकाम्या पोटी एक चमचा तूप खाल्ल्याने काय होते? जाणून घ्या जबरदस्त फायदे



त्वचा निरोगी ठेवते-

तूपामध्ये व्हिटॅमिन ए, डी, ई आणि के तसेच अँटीऑक्सिडंट्स भरपूर प्रमाणात असतात, जे त्वचेसाठी खूप फायदेशीर असतात. अशा परिस्थितीत, आहारात याचा समावेश केल्याने त्वचेला आतून पोषण मिळते, ज्यामुळे तुमची त्वचा निरोगी आणि चमकदार बनते. तसेच, वृद्धत्वाची लक्षणे देखील कमी होऊ शकतात.

बद्धकोष्ठतेपासून आराम मिळतो-

तूप पचनसंस्थेसाठी नैसर्गिक वंगण म्हणून काम करते. हे मल मऊ करण्यास आणि नियमित आतड्यांच्या हालचालींना प्रोत्साहन देण्यास मदत करते. रिकाम्या पोटी तूप खाल्ल्याने बद्धकोष्ठता कमी होते आणि आतड्यांचे एकूण आरोग्य सुधारते.

पचन सुधारते-

दररोज रिकाम्या पोटी एक चमचा तूप खाल्ल्याने पाचक एंजाइमचे उत्पादन वाढते. यामुळे पोटात आम्ल तयार होते आणि अन्नाचे विघटन आणि पोषक तत्वांचे शोषण होण्यास मदत होते, ज्यामुळे पचनक्रिया वाढू शकते.

वजन नियंत्रित करण्यास उपयुक्त-

साधारणपणे असे मानले जाते की तूप खाल्ल्याने वजन वाढते, परंतु हे खरे नाही. ते मर्यादित प्रमाणात खाल्ल्याने वजन नियंत्रणात राहण्यास मदत होते. त्यात निरोगी चरबीचे प्रमाण जास्त असते. ज्यामुळे ते पोट बराच काळ भरलेले ठेवते आणि जास्त खाण्यापासून रोखते.

ऊर्जा मिळते-

तूपामध्ये फॅटी ॲसिड भरपूर प्रमाणात असते. जे पचायला सोपे असतात आणि शरीराचे चयापचय सुधारतात. ज्यामुळे ऊर्जा मिळते. दिवसाची सुरुवात तुपाने केल्याने तुम्हाला दिवसभर सक्रिय राहण्यासाठी ऊर्जा मिळते.

# हिवाळ्यात दररोज खा 'या' बिया, आपोआप दूर होईल व्हिटॅमिन डीची कमतरता

हिवाळ्यात बहुतेक लोक व्हिटॅमिन-डीच्या कमतरतेने ग्रस्त असतात. सूर्यप्रकाशाचा अभाव, आहाराचा अभाव, अनुवंशिकता आणि त्वचेचा रंग यासारख्या अनेक कारणांमुळे व्हिटॅमिन डीची कमतरता उद्भवते. जरी व्हिटॅमिन डीचा प्राथमिक स्रोत सूर्यप्रकाश असला तरी, काही पदार्थदेखील त्याचे चांगले स्रोत आहेत.

यामध्ये काही बियादेखील समाविष्ट आहेत. जे केवळ व्हिटॅमिन-डीनेच नव्हे तर इतर अनेक पोषक तत्वांनी देखील समृद्ध आहेत. व्हिटॅमिन डी वाढवण्यासाठी ५ सर्वोत्तम बियाण्यांबद्दल जाणून घेऊया.



हिवाळ्यात दररोज खा या बिया, आपोआप दूर होईल व्हिटॅमिन डीची कमतरता

व्हिटॅमिन डी का आवश्यक आहे?

हे आपल्या शरीरासाठी एक आवश्यक पोषक तत्व आहे. जे हाडे मजबूत करण्यासाठी, निरोगी रोगप्रतिकारक शक्ती राखण्यासाठी आणि मानसिक आरोग्य राखण्यासाठी खूप महत्वाचे आहे. ते शरीरात कॅल्शियम शोषण्यास मदत करते आणि हाडे कमकुवत होण्यापासून रोखते.

**व्हिटॅमिन डी वाढवणारी बियाणे-**

**चिया सीड्स-**

चिया सीड्स हे पोषक तत्वांचे एक शक्तिशाली केंद्र मानले जातात. व्हिटॅमिन डी सोबत, ओमेगा-३ फॅटी ॲसिड, फायबर आणि प्रथिने देखील त्यात आढळतात. चिया सीड्स पाण्यात भिजवून, स्मूदीमध्ये मिसळून किंवा दह्यासोबत खाऊ शकता. शरीराला ऊर्जा देण्यासोबतच, हे बिया व्हिटॅमिन डीची कमतरता देखील पूर्ण करतात.

**जवस बिया-**

जवसच्या बियांमध्ये व्हिटॅमिन डी आणि ओमेगा-३ फॅटी ॲसिड भरपूर प्रमाणात असतात. हे बियाणे हृदयाच्या आरोग्यासाठी अत्यंत फायदेशीर आहेत आणि व्हिटॅमिन-डीच्या कमतरतेवर मात करण्यास देखील मदत करतात. हे बारीक करून सूप, सॅलड किंवा स्मूदीमध्ये मिसळून खाऊ शकता.

**भोपळ्याच्या बिया-**

भोपळ्याच्या बियांमध्ये व्हिटॅमिन डी तसेच झिंक, मॅग्नेशियम आणि ओमेगा-३ फॅटी ॲसिड भरपूर प्रमाणात असतात. या बिया हाडे मजबूत करण्यास आणि रोगप्रतिकारक शक्ती वाढविण्यास मदत करतात. व्हिटॅमिन डीची कमतरता भाजून किंवा कच्चे खाल्ल्याने दूर करता येते.

**तीळ-**

तीळ हे व्हिटॅमिन डी आणि कॅल्शियमचा उत्तम स्रोत आहे. या बिया हाडे मजबूत करण्यास आणि ऑस्टियोपोरोसिसचा धोका कमी करण्यास मदत करतात. तीळ लाडू, चिक्की किंवा सॅलडमध्ये मिसळून खाऊ शकता.

**सूर्यफुलाच्या बिया-**

सूर्यफुलाच्या बिया व्हिटॅमिन डीचा चांगला स्रोत आहेत. त्यामध्ये मॅग्नेशियम, व्हिटॅमिन ई आणि निरोगी फॅट्स देखील आढळतात. जी शरीरासाठी फायदेशीर असतात. या बिया नियमितपणे खाल्ल्याने व्हिटॅमिन-डीची कमतरता दूर होऊ शकते. हे सॅलड, स्मूदीमध्ये खाऊ शकता किंवा ॲव्होकॅडो टोस्टवर शिंपडून खाऊ शकता.

# चेहऱ्यावर फारच सुरकुत्या दिसत आहेत? 'या' सोप्या टिप्स फॉलो करून मिळेल विशीतलं सौंदर्य

वाढत्या वयानुसार त्वचेवर अनेक बदल दिसू लागतात. यामध्ये त्वचेवरील सुरकुत्या आणि बारीक रेषा सर्वात सामान्य आहेत. कारण वय वाढत असताना त्वचेतील कोलेजन आणि इलास्टिन नावाच्या प्रथिनांचे प्रमाण सतत कमी होऊ लागते. अशा परिस्थितीत त्वचेची आर्द्रता, चमक आणि सौंदर्य कमी होऊ लागते. यासोबतच त्वचेवर सुरकुत्या आणि बारीक रेषा देखील दिसू लागतात.

तुमच्याही चेहऱ्यावर सुरकुत्या असतील तर तुम्ही हे घरगुती उपाय देखील वापरून पाहू शकता. चला तर मग जाणून घेऊया चेहऱ्यावर सुरकुत्या दिसल्यावर काय घरगुती उपाय करावे.. चेहऱ्यावर फारच सुरकुत्या दिसत आहेत? या सोप्या टिप्स फॉलो करून मिळेल विशीतलं सौंदर्य

**दररोज रिकाम्या पोटी एक चमचा तूप खाल्ल्याने काय होते? जाणून घ्या जबरदस्त फायदे**



**चेहऱ्यावर कोरफडीचा वापर करा-**

जर तुमच्या चेहऱ्यावर सुरकुत्या असतील तर तुम्ही कोरफडीचा वापर करू शकता. त्वचेशी संबंधित सर्व समस्या दूर करण्यासाठी कोरफडीचा वापर प्रभावी ठरू शकतो. खरं तर, कोरफडीमध्ये भरपूर पोषक तत्व असतात. त्यात व्हिटॅमिन ई असते, जे अँटीऑक्सिडंट म्हणून काम करते. याशिवाय, कोरफडी त्वचेला हायड्रेट करते आणि कोलेजनचे उत्पादन देखील वाढवते. यासाठी, कोरफडीचा जेल घ्या, तो तुमच्या संपूर्ण चेहऱ्यावर लावा. २०-२५ मिनिटांनी, चेहरा पाण्याने स्वच्छ करा. सुरकुत्या दूर करण्यासाठी, तुम्ही दिवसातून २-३ वेळा कोरफडीचा वापर करू शकता.

**तेल मालिश करा-**

ज्याप्रमाणे केसांना तेलाने मालिश करणे आवश्यक आहे. त्याचप्रमाणे चेहऱ्यासाठी देखील तेल मालिश केले पाहिजे. तेल मालिशमुळे चेहऱ्यावरील रक्ताभिसरण वाढते. ते कोलेजन उत्पादन देखील वाढवते. तेल मालिश तुमच्या चेहऱ्यावरील सुरकुत्या आणि बारीक रेषा दूर करू शकते. यासाठी तुम्ही बदाम तेल, खोबरेल तेल किंवा आर्गन तेल वापरू शकता. तुम्हाला हवे असल्यास, तुम्ही तुमच्या चेहऱ्याला आवश्यक तेलाने मालिश देखील करू शकता. पण त्यात नक्कीच खोबरेल तेल घाला, अन्यथा तुम्हाला खाज सुटणे आणि जळजळ होण्याची समस्या येऊ शकते.

**केळीचा मास्क लावा-**

केळी चेहरा हायड्रेट करण्याचे काम करते. केळीमध्ये नैसर्गिक तेल आणि जीवनसत्त्वे असतात. जे त्वचेच्या आरोग्यासाठी खूप महत्वाचे मानले जातात. जर तुमच्या चेहऱ्यावर सुरकुत्या असतील तर तुम्ही केळीचा फेस मास्क लावू शकता. यासाठी, एक केळी घ्या आणि ते चांगले मॅश करा. आता ते तुमच्या चेहऱ्यावर लावा आणि अर्ध्या तासाने चेहरा धुवा. केळीमध्ये असलेले गुणधर्म त्वचेशी संबंधित अनेक समस्या दूर करण्यास मदत करू शकतात. केळीचा फेस मास्क सुरकुत्या काढून चेहरा मऊ आणि चमकदार बनवतो.

**जीवनसत्त्वे आणि खनिजांनी समृद्ध आहार घ्या-**

चेहऱ्यावरील सुरकुत्या आणि बारीक रेषा दूर करण्यासाठी जीवनसत्त्वे आणि खनिजांनी समृद्ध आहार घेणे खूप महत्वाचे आहे. चेहऱ्यावरील सुरकुत्या दूर करण्यासाठी कोलेजनचे उत्पादन वाढवणे खूप महत्वाचे आहे. त्वचेवरील कोलेजन वाढवण्यासाठी व्हिटॅमिन सी आणि व्हिटॅमिन ई समृद्ध पदार्थांचे सेवन करा.

**पुरेसे पाणी प्या-**

चेहऱ्यावर वेगवेगळ्या प्रकारचे फ ेस मास्क लावल्याने तुमच्या सुरकुत्या जात नाहीत. यासाठी, चांगले खाणे आणि पिणे देखील खूप महत्वाचे आहे. जर तुम्हाला चेहऱ्यावरील सुरकुत्या दूर करायच्या असतील तर यासाठी पुरेसे पाणी प्या. यामुळे तुम्ही हायड्रेटेड राहाल आणि तुमची त्वचा चमकेल. तसेच, पाणी पिल्याने सुरकुत्या आणि बारीक रेषा बऱ्याच प्रमाणात टाळता येतात. पाणी पिणे केवळ आरोग्यासाठीच नाही तर त्वचेसाठी देखील खूप महत्वाचे आहे.

# तुमची 'लाडकी लेक' वयात येणार! तिच्या पहिल्या मासिक पाळीसाठी 'असे' करा तयार

स्त्रीचा जन्म म्हणजे निसर्गाचे वरदान समजले जाते. स्त्री ही आयुष्याच्या प्रत्येक टप्प्यातून जात असताना विविध नातंही निभावते, आधी मुलगी, मग पत्नी, नंतर आई, आजी असे विविध नाती ती सांभाळत असते. अशात मासिक पाळी(ाशर्पीीर्ीरिंळेप) येणं म्हणजे काय हे अनेक मुलींना माहित नसते, अशी परिस्थिती जेव्हा अचानक येते, तेव्हा बहुतेकदा मुली घाबरतात, त्यांना अनेक प्रश्न पडतात. मग त्यासाठी जर तुमची लाडकी लेकसुद्धा लवकरच वयात येणार असेल, तर तिच्या योग्य वयात मासिक पाळीबद्दल तिला काही गोष्टी मनमोकळेपणाने बोलणे गरजेचे आहे.

आजही भारतात अनेक मुलींना मासिक पाळी येण्यापूर्वी फारशी माहिती नसते.

मासिक पाळी म्हणजेच पीरियड्स हा प्रत्येक मुलीच्या आयुष्यातील महत्त्वाचा टप्पा असतो. याबद्दल जाणून घेणे खूप महत्वाचे आहे, जरी आजही भारतात अनेक मुलींना मासिक पाळी येण्यापूर्वी याबद्दल फारशी माहिती नसते. अशा परिस्थितीत, प्रत्येक आईने आपल्या मुलीच्या तारुण्यात येण्यापूर्वी याबद्दल बोलले पाहिजे. जेणेकरून या आकस्मिक परिस्थितीतून जात असताना त्या घाबरणार नाहीत आणि अशा परिस्थितीला साम ोऱ्या जातील. जर तुम्ही तुमच्या मुलीला मासिक पाळीशी संबंधित माहिती देताना थोडे गोंधळात असाल तर हा लेख तुमच्यासाठी खूप उपयुक्त ठरू शकतो.

लेकीला तारुण्य आणि मासिक पाळीबद्दल सांगा

तुमच्या मुलीला मासिक पाळी येण्यासाठी मानसिकदृष्ट्या तयार करा, तिला सांगा की मासिक पाळी येणे ही एक नैसर्गिक प्रक्रिया आहे, जी तारुण्याच्या वाटेवर प्रत्येक मुलीला होते आणि तिला त्यासाठी तयार राहावे लागते. हा आपल्या शारीरिक विकासाचा एक भाग आहे. तारुण्य हा एक शारीरिक बदल आहे, ज्यामध्ये आपला मेंदू काही रसायने स्रावित करतो, ज्याला आपण हार्मोन्स म्हणतो. हार्मोन्समुळे आपल्या शरीरात स्तनांचा आकार वाढणे, कंबर आणि नितंबांचा आकार वाढणे, शरीरावरील केसांची वाढ, योनीमार्गाचा विकास आणि योनीतून स्राव सुरू होणे असे अनेक बदल घडून येतात. या कारणामुळे शरीरात मासिक पाळी सुरू होते. मुलगा आणि मुलगी दोघांनाही तारुण्यवस्थेतून जावे लागते. त्यामुळे याला अजिबात घाबरू नका.

मासिक पाळीच्या लक्षणांबद्दल सांगा

तुमच्या मुलीला मासिक पाळी सुरू होण्यापूर्वी शरीरात कोणत्या प्रकारची लक्षणे दिसू लागतात ते सांगा आणि मासिक पाळी किती काळ टिकते ते देखील तिला सांगा.

मासिक पाळी येण्यापूर्वी स्तनांमध्ये अनेक बदल होतात. या काळात स्तनांच्या आकारात बदल, सूज आणि वेदना होऊ शकतात.

मासिक पाळी येण्याआधी, आपल्या मूडमध्ये खूप बदल होतो, जसे की दु:ख, तणाव किंवा चिडचिड.

अनेकांना मासिक पाळी येण्यापूर्वी अशक्तपणा जाणवू लागतो. अशा स्थितीत काहीही करून ते लगेच थकतात.

मासिक पाळी येण्यापूर्वी पाय दुखू लागतात. या वेळी, मांड्यांमध्ये देखील एक विचित्र खेचण्याची संवेदना दिसू लागते.

अनेक वेळा मासिक पाळी येण्याआधी पोट फुगणे, पाठदुखी आणि शरीरात जडपणा येणे असे प्रकारही होतात.

सॅनिटरी पॅड कसे वापरावे

अनेक मुलींना पहिली मासिक पाळी आल्यावर पॅड कसे वापरावेत याची कल्पना नसते. अशा परिस्थितीत, त्यांना वेळेपूर्वी कळविणे ही आपली जबाबदारी आहे. यासाठी तुमच्या मुलीला पॅड दाखवा आणि ते कसे वापरायचे ते सांगा. तुम्हाला हवे असल्यास, तुम्ही त्यांना मासिक पाळीच्या कप आणि टॅम्पन्सबद्दल देखील सांगू शकता.

स्वच्छता आणि आहाराबद्दल सांगा

सॅनिटरी पॅड्स कसे वापरावे यासोबतच तुमच्या मुलीला मासिक पाळीदरम्यान तिच्या प्रायव्हेट पार्टच्या स्वच्छतेबद्दलही सांगा. तसेच त्यांना मासिक पाळीच्या क्रॅम्प्स आणि मासिक पाळीदरम्यानच्या समस्यांबद्दल मोकळेपणाने सांगा जेणेकरून वेळ येईल तेव्हा त्यांना चांगल्या प्रकारे तोंड देता येईल. याशिवाय मासिक पाळी दरम्यान कोणता आहार घ्यावा याची माहिती द्या. तुमच्या मुलीला मासिक पाळीच्या प्रवासाबद्दल माहिती देताना अजिबात संकोच करू नका. त्याच वेळी, जर तुमच्या मुलीला वयाच्या १६ व्या वर्षापर्यंत मासिक पाळी येत नसेल तर तिला नक्कीच एखाद्या चांगल्या स्त्रीरोग तज्ज्ञाकडे घेऊन जा. मासिक पाळीबाबत तुमच्या मुलीचे कोणतेही प्रश्न लक्षपूर्वक ऐका आणि त्यांची हुशारीने उत्तरे द्या.

# व्हॉट्सआपच्या ब्लू सर्कलकडून करुन घ्या हे काम, दूर होतील तुमच्या सर्व समस्या

तुम्ही व्हॉट्सॲप वापरत असाल, तर ही माहिती तुमच्यासाठी आहे. व्हॉट्सॲपचा वापर केवळ चॅटिंग, कॉलिंग किंवा व्हिडीओ कॉल करण्यासाठी केला जात नाही, तर त्याद्वारे तुम्ही इतर गोष्टीही करू शकता. व्हॉट्सॲप वर दाखवलेल्या ब्लू सर्कलवर क्लिक करताच तुमचे काम पूर्ण होईल. येथे तुम्हाला जास्त काही करावे लागणार नाही, फक्त तुमच्या आज्ञा पाळल्या जातील.

ब्लू सर्कल म्हणजे मेटा एआय, जर तुम्ही आधीच मेटा एआय वापरत असाल, तर आतापर्यंत तुम्ही फक्त फोटोच जनरेट केले असतील. पण आता तुम्ही फक्त फोटोसाठीच नाही तर वेगवेगळी कामे करू शकता. बऱ्याच वेळा मेल्स लिहावे लागतात, तेव्हा घाईत कोणता मजकूर लिहावा हे समजत नाही. यामध्ये तुम्हाला फक्त एक प्रॉम्प्ट लिहून पाठवावा लागेल, त्यानंतर काही सेकंदात निकाल येईल. संपूर्ण मेलचा मसुदा आणि सामग्री तुमच्या समोर येईल. तुम्हाला नोकरीसाठी अर्ज करायचा असेल आणि त्यासाठी बायोडाटा लिहिण्याबाबत संभ्रमात असाल, तर आता तुमचे काम काही सेकंदात होईल. एवढेच नाही तर तुम्ही जुना रेझ्युमे देखील अपडेट करू शकता. चशींर अख चे चॅट ओपन केल्यानंतर, तुम्हाला ज्या प्रोफेशनसाठी रेझ्युमे तयार करायचा आहे त्या प्रोफेशनचा प्रॉम्प्ट लिहावा लागेल. उदाहरणार्थ, जर तुम्ही थीळसहीं र्गेीपरश्रळींीं ठशीीाश लिहिला तर तुम्हाला त्याचा परिणाम पूर्ण स्वरूप मिळेल. सर्व महत्त्वाच्या गोष्टी बायोडाटामध्ये लिहिल्या जातील. तुमच्या पात्रतेनुसार तुम्हाला फक्त थोडे बदल करावे लागतील.

याशिवाय, जर तुम्हाला स्वयंपाक करायची आवड असेल किंवा तुम्ही स्वयंपाक शिकत असाल तर तुम्हाला येथे पाककृती मिळतील. शूर अघ ची सर्वात चांगली गोष्ट म्हणजे ती तुमच्यासाठी फक्त एक किंवा दोन भाषांमध्ये उपलब्ध नाही. यामध्ये तुम्ही हिंदीत लिहून कोणताही प्रश्न विचारू शकता. त्यावर तुम्हाला कोणत्याही प्रकारची सोपी रेसिपी मिळेल. तुम्ही शूर अघ वरून कोणत्याही प्रकारचा शॉर्टकट देखील विचारू शकता, जर तुम्ही कंटेंट रायटिंगचे काम करत असाल, तर तुम्हाला प्रत्येक विषयावर लिहिलेला म जकूर मिळेल. जर तुमच्या व्हॉट्सॲपवर मेटा एआय दिसत नसेल, तर गुगल प्ले स्टोअर किंवा ॲपल ॲप स्टोअरवरून व्हॉट्सॲप अपडेट करा.

# ट्रम्प यांना मिळाली आणखी एक संधी

निवडणुकीत दिलेली आश्वासने ट्रम्प यांना प्रत्यक्षात आणता आलेली नाहीत. यातून तेथील नागरिकांचा रोष वाढत आहे. महत्त्वाच्या मुद्द्यांवरून लक्ष वळवण्यासाठी ट्रम्प यांना नवीन प्रकरण मिळाले. अमेरिकेत 'व्हाईट हाऊस'जवळ झालेली गोळीबाराची घटना डोनाल्ड ट्रम्प यांच्या दृष्टीने 'संधी' ठरणार आहे. बाहेरील देशांमधून येणारे किती धोकादायक आहेत, याचे काल्पनिक चित्र रंगविण्यास त्यांनी सुरुवात केली. विशेषतः आशियाई देशांसंदर्भात व्हिसा निर्बंध कडक केले जातील, अशी घोषणा त्यांनी केली आहे.



गोळीबार करणारा आपल्याच देशाच्या गुप्तहेर संघटनेचा माजी हस्तक आहे, हे मात्र त्यांच्याकडून सांगितले जाणार नाही. 'मेक अमेरिका, ग्रेट अगेन' हे प्रचारात सांगितले खरे; पण ते प्रत्यक्षात आणण्याच्या नावाखाली त्यांच्याकडून जे निर्णय घेण्यात आले त्याचा उलट परिणाम दिसत आहे. रहमानउल्ला लकनवाल, या तरुणाने व्हाईट हाऊसजवळ गोळीबार केला. यात नॅशनल गार्डमध्ये कार्यरत असलेल्या युव-तीचा मृत्यू झाला. हा रहमानउल्ला २०२१ पासून अमेरिकेत असल्याचे सांगण्यात येते. तो अफगाणिस्तानचा नागरिक आहे. अफगणिस्तानातून तालिबानची राजवट संपविण्यासाठी अमेरिकी गुप्तहेर संघटना 'सीआयए'ला स्थानिक तरुणांची गरज होती. त्यासाठीची भरती पाकिस्तानच्या 'आयएसआय'मार्फत होत असे. मग सीआयएकडून तरुणांना प्रशिक्षण दिले जायचे. रहमानउल्ला त्यापैकी एक. म्हणजेच अमेरिकेने निर्माण केलेली ही विषवल्ली. अफगाणिस्तानात जबरदस्त मार खाल्ल्यावर तालिबानकडे सत्ता सोपविण्याशिवाय अमेरिकेसमोर पर्याय राहिला नाही. ज्या रीतीने अमेरिकेच्या पुढाकाराने ती प्रक्रिया घडली ते जगाला चकित करणारे होते. आता डोनाल्ड ट्रम्प त्यांच्या परिपाठाप्रमाणे व्हाईट हाऊस गोळीबारानंतर माजी अध्यक्ष ज्यो बायडेन यांना दूषणे देत आहेत. बायडेन यांच्या धोरणामुळे धोकादायक स्थलांतरित अमेरिकेत आले, असा कांगावा त्यांनी सुरू केला. तालिबानविरुद्ध लढण्यासाठी जोपर्यंत उपयोग होत होता तोपर्यंत रहमानउल्लासारखे तरुण अमेरिकेसाठी रचनात्मक कार्य करणारे होते! आता ते 'धोकादायक' आहेत आणि ट्रम्प यांच्याच भाषेत सांगायचे तर 'जनावर' आहेत.

**अफगाणिस्तानसाठी नेपथ्य रचना?**

सीआयएसाठी काम केलेल्या रहमानउल्ला याला अमेरिकेत प्रवेश मिळाला, तीन-चार वर्षे त्याचे तेथे वास्तव्य आहे, यात नवल वाटण्याचे कारण नाही. 'लष्करी गणवेशातील ओसामा बिन लादेन' असे अचूक वर्णन झालेले असीम मुनीर 'व्हाईट हाऊस'ला पावन करून गेले. इतरांची सुरक्षितता धोक्यात आली तर चालेल; पण अमेरिका सुरक्षित असली पाहिजे, हीच कायम भूमिका! दहशतवादाच्या मुद्द्यावर अमेरिकेकडून निवडक फरक करणे बंद होण्याची अजिबात शक्यता नसून या असुरक्षिततेला तिनेच निमंत्रण दिले आहे.



पाकिस्तान आणि अफगाणिस्तान यांच्यात संघर्ष सुरू आहे. याआधी पाकिस्तानने एकदा काबूलवर हवाई हल्ले केले. अलीकडे पुन्हा हल्ले करून नऊ लहान मुलांसह एका महिलेचा पाकिस्तानने बळी घेतला. दहशतवाद्यांचे तळ, हे म्हणे पाकिस्तानचे लक्ष्य होते! हे जाणीवपूर्वक सुरू आहे. व्हाईट हाऊसजवळील गोळीबारामागे पाकिस्तान- अफगाणिस्तान यांच्या संघर्षाचा संदर्भ तर नाही ना? हे पाहावे लागेल. भारत-अफगाणिस्तानची जवळीक वाढत असताना ट्रम्प यांनी अफगाणिस्तानातील बगराम विमानतळाकडे नजर वळवली. रशिया, चीन यांच्यावर नियंत्रण आणण्याच्या व्यूहरचनेचा भाग म्हणून अमेरिकेला पुन्हा अफगाणिस्तानात शिरकाव करायचा आहे. तालिबान सरकारकडून तेहरिक ए तालिबानच्या सदस्यांना आश्रय दिला जात असल्याचा ठपका ठेवत पाकिस्तानने अफगाणिस्तानवर हल्ले चढविले. ती नेपथ्यरचना अर्थात ट्रम्प आणि अमेरिका यांचा बगरामसाठीचा मार्ग सुलभ करण्यासाठी आहे, यात शंका नको. अफगाणिस्तान आणि तालिबान यांच्याविरुद्ध पाऊल उचलण्यासाठी रहमानुल्ला याच्या कृतीमुळे अमेरिकेला संधी मिळाली आहे. तशी संधी मिळावी, यासाठी त्याला हाताशी धरण्यात आले का? असा संशय घेण्यास जागा आहे. अर्थात, याबाबतचे सत्य इतक्यात जगासमोर येण्याची कोणतीच शक्यता नाही. अल कायदा संघटनेशी संबंधित सिरियाचे अध्यक्ष असोत किंवा पाकिस्तानचे सर्वेसर्वा बनलेले असीम मुनीर, व्यावसायिक हित साधून देणारे दहशतवादी ट्रम्प यांना चालणार आ-हेत. त्यामुळे रहमान उल्लाने केलेल्या गोळीबारानंतरची त्यांची भूमिका विश्वास ठेवावा, अशी नाही.

# बालक कशी शिकणार कौशल्य?



१. भाषा आणि संवाद कौशल्य - भाषेचं महत्व आपल्या सगळ्यांनाच माहित आहे. या वयातील मुलं साधारणप-णे खूप चीडचीड करतात, ओरडून बोलतात, किंवा खूप कमी बोल-तात अशा प्रकारच्या तक्रारी पालक करताना दिसतात. मग या सुट्टीमध्ये मुलांच्या भाषा कौशल्यावर थोडं जास्त लक्ष द्या. नवीन गोष्टी वाचणं, एखाद्या स्थळाबद्दल माहिती घेणं, चित्र काढून त्याबद्दल बोलणं अशा वेगवेगळ्या पद्धती तुम्ही भाषा कौशल्य वाढवण्यासाठी करू शकता. २. स्वत: ची काळजी घेण्याची कौशल्ये- साधारण ३ वर्षानंतरची मुलं वेग वेगळ्या पद्धतीने स्वतःची काळजी घेऊ शकतात. कपडे घालणे, आंघोळ करताना साबण लावणे, अंगावर पाणी घेणे, शू-शी स्वत:ची स्वत: करता येणे. स्वतःच्या हाताने जेवण करणे, घरामध्ये लहानसहान कामात मोठ्यांना मदत करणे अशी कामं मुलं करू शकतात.

# प्रदूषणाचा गर्भवती महिला आणि मुलांवर गंभीर परिणाम

पुण्यातील 'एक्यूआय' २०० वर

पुणे : अनियंत्रित शहरीकरण आणि वाहनांच्या वाढत्या धुरामुळे प्रदूषण संपूर्ण भारतासाठी गंभीर आरोग्यसंकट बनले आहे. राष्ट्रीय राजधानी दिल्लीमध्ये काही आठवड्यांपासून 'एअर क्वालिटी इंडेक्स' अर्थात 'एक्यूआय' ४००हून अधिक नोंदविण्यात आला असून, तो 'गंभीर' श्रेणीत मोडतो.दिल्लीपेक्षा काही वेगळी परिस्थिती पुण्यात नाही. गेल्या काही दिवसांत पुण्यातील 'एक्यूआय' सातत्याने २००च्या वर गेला असून, तो 'खराब' श्रेणीमध्ये मोडतो. असे दीर्घकालीन प्रदूषण गर्भवती महिला, मुले आणि ज्येष्ठ नागरिकांसाठी अत्यंत धोकादायक ठरू शकते.





सूर्या मदर अँड चाइल्ड सुपर स्पेशालिटी हॉस्पिटल, पुणे येथील पेडियाट्रिक्स आणि निओनेटलॉजी सल्लागार डॉ. जयंत खंदारे म्हणाले, महानगरांमध्ये, त्यातही पुण्यातील वाढत्या प्रदूषणाचा गर्भवती महिलांवर आणि मुलांवर अतिशय घातक परिणाम होत आहे. मुले दूषित हवेला सामोरे गेल्यास त्यांना घरघर, श्वास घेण्यास त्रास आणि दमा होण्याचा धोका वाढतो. याशिवाय पुण्यातील विषारी हवा गर्भवती महिलांसाठीही गंभीर श्वसनासंबंधी अडचणी निर्माण करू शकते.

गर्भवती महिलांवरील दुष्परिणाम-गर्भपात, मृतजन्म आणि अकाली प्रसूतीचा वाढलेला धोका. बाळाचे कमी वजन आणि गर्भाच्या वाढीमध्ये मर्यादा. उच्च रक्तदाब, गर्भावस्थेतील मधुमेह आणि हृदयविकाराचा धोका. प्लेसेंटाचे नुकसान आणि बाळाकडे जाणार्या ऑक्सिजन पुरवठ्यात घट.मुलांवरील दुष्परिणाम दमा, न्युमोनिया यांसारखे श्वसनाचे गंभीर त्रास. ॲलर्जी आणि शिकण्यात अडचणी येण्याचा धोका. फुफ्फुसांची वाढ खुंटणे आणि क्षमता कमी होणे. संसर्ग आणि आजारांची लागण होण्याची शक्यता.

**प्रतिबंधासाठी सूचना**

'एअर क्वालिटी इंडेक्स' नियमित तपासा. प्रदूषण जास्त असताना घरातच राहा.'एअर प्युरिफायर' आणि 'एन ९५' मास्कचा वापर करा. प्रचंड प्रदूषणाच्या वेळी घरातील खिडक्या बंद ठेवा.अँटिऑक्सिडंटयुक्त आहार घ्या आणि पुरेसे पाणी प्या. प्रदूषणाची पातळी अधिक असताना घराबाहेर पडणे टाळा.

## मधुमेही रूग्ण Peanut Butter खाऊ शकतात का?

जाणून घ्या अचूक उत्तर



बदलत्या लाईफस्टाईलमुळे चुकीचा आहारामुळे मधुमेही रूग्णांमध्ये वाढ होताना दिसतेय. यामुळे मधुमेही रूग्णांना त्यांच्या खाण्या-पिण्याच्या सवयींवर विशेष लक्ष द्यावं लागतं. मधुमेही रूग्णांच्या मनात खाण्या-पिण्याच्या सवयीबाबत अनेक प्रश्न असतात. यामधील एक प्रश्न म्हणजे मधुमेही रूग्णांनी पीनट बटर खावा का? मधुमेही रूग्ण खाऊ शकतात का अनेक रिप-ोर्टमध्ये दावा करण्यात आला आहे की, मधुमेही रूग्ण पीनट बटर खाऊ शकतात. पीनट बटरच्या सेवनाने कोणतंही नुकसान होत नाही. मात्र झशरर्पीं ईीींशी खाताना तुम्हाला ते प्रमाणात खाल्लं पाहिजे. कारण अधिक प्रमाणात याचं सेवन केल्याने तुमची तब्येत बिघडू शकते.पीनट बटरमध्ये असलेले गुण ब्लड शुगरचा स्तर कंट्रोल करण्यासाठी उपयुक्त मानले जातात. यामुळे मधुमेही रूग्णांनी डॉक्टरांच्या सल्ल्यानुसार, पीनट बटरचं सेवन करावं.

## विनोद




गिऱ्हाईक : मी एक चूक केली.

वेटर : काय झाले साहेब?

गिऱ्हाईक : तुला ङ्गटिपफ द्यायच्याऐवजी मी ती तुझ्या मालकाला दिली.

वेटर : मोठीच चूक झाली साहेब. आता ती मला कधीही मिळणार नाही.

## संदेश

Movie titles related to engg students:
exams – socha na tha,
classes – kabhi kabhi,
question papers – na tum jano na hum,
copying – yaarana,
maths2 – asambhav,
maths1 – mission impossible,
environmental sciences – pyar mein kabhi kabhi,1st semester – kuch to hai,
2nd semester – yeh kya ho raha hai,
distinction – kal ho na ho,
1st class – raju bangaya gentleman,
2nd class – dil mange more
fail – phir milenge

## सुविचार



राग जाळा नाही तर तो तुम्हाला जाळेल.

– अज्ञात

**संस्कृत सुभाषित**

**न स्वप्नेन जयेन्निद्रां, न कामेन जयेत् स्त्रियम।**
**नेन्धनेन जयेदग्नि, न पानेन जयेत् सुरा ।।**

**अर्थ –** अतिनिद्रेची इच्छा बाळगून निद्रेवर विजय मिळवता येत नाही. स्त्रीची कामवासना कामोपभोगाने शमत नाही, उलट ती वाढते, अग्नीत जळण घातल्याने तो जास्त भडकतो. अतिमद्यपानाची आसक्ती धरून मद्यपानाची इच्छा शमत नाही, उलट ती भडकते. भोगाचा अतिरेक केल्याने भोगाची इच्छा वाढतच जाते.

# मनोरंजक महाशब्दकोडे



### आडवे शब्द

१. खर्चात कपात
६. पुष्कट
९. पोटापुरता शिधा
११. प्रमाणपत्र
१२. विश्रांती
१४. गणगोत
१६. तात्काळ
१८. आपला देश
१९. मोठी चूल
२०. चोरी करणारा
२२. झाडलोट
२४. वाढलेला व्याप
२५. जरतारीचा मोर यावर नाचतो
२७. प्रयत्न
२८. घाव, प्रहार
२९. रोखलेली नजर
३१. संतोष, आनंद
३४. समुद्रकिनारा
३८. पुरुष
३९. शिव! शिव!
४०. नुसतीच भटकंती
४१. विशेष
४२. अत्यंत यातनामय अवस्था
४५. माळ, सर
४६. हात
४८. पर्जन्य
४९. फोडातील द्रव
५०. गप्पांची जागा
५२. वक्र
५३. पूर्ण भेदून जाणारे
५४. शरीर
५५. अरण्य, जंगल
५६. तीव्र, अत्यंत टोकदार
५७. दिवस
५९. अर्धांगवायू
६१. चर्चा
६३. कावळा
६४. थोडेसुद्धा, अल्पप्रमाण
६५. टोळीचा प्रमुख
६७. खिडकी
६९. मच्छर
७१. तातडीचे संदेशवहन करण्याचा नामशेष झालेला प्रकार
७३. हनुमान (ग्रा.)
७५. प्रेम, ममता
७७. हमाल
८१. सूर्याचे एक नाव
८२. ठोक, हाण!
८३. युक्ती
८४. नेता, पुढारी

### उभे शब्द

१. कपडालत्ता
२. टिंगल, टवाळी
३. केव्हा (ग्रा.)
४. शाश्वत, चिरंतन
५. सोन्या-चांदीचा व्यापारी
७. महाशिवरात्रीचा मराठी महिना
८. परस्पर
९. पुन्हा पुन्हा
१०. प्रगती, उन्नत
१२. विमान
१३. कच्चे राहिल्यास निरूपयोगी मृत्तिकापात्र
१५. निवासस्थान
१७. आत-बाहेर करण्याची चौकट
२१. दात
२३. वंशपरंपरागत अधिकार
२६. फळातील द्रव
२७. सामान्य
३०. तापापूर्वीचे शहारे
३२. माणूसकी
३३. धैर्य, हिंमतीचे काम
३५. मगज
३६. कडक, न दबणारे
३७. साहित्यातील नऊ भावना
४१. मीठाची चव
४२. नाकी दम आणणारा आकडा
४३. भरपूर रस असलेला
४४. वेडावाकडा
४५. परिस्थिती
४६. पळसाचा डिंक
४७. जन्म-मृत्यू
४८. मोदकाचे आच्छादान
५०. पत्र
५१. अभिप्राय
५३. नाविकदल
५५. मध्यरात्रीचा पाऊस
५८. विरोध, द्वेष
६०. आठवाड्याचा दिवस
६२. चिकटून, जवळ
६६. अति तीव्र, जाळणारे
६८. माफी, दया
७०. दाताखालचा, मदतनीस
७२. महान
७४. कैकयीची दासी
७६. वेदना
७७. वजन
७८. सुंदर तरुणी, पत्नी
७९. शंकर
८०. शेवट

### आडवे उत्तरे

१.काटकसर ६.अमाप ९.पसाभार ११.परवाना १२.आराम १४.घरदार १६.तडकाफडकी १८.भारत १९.भट्टी २०.चोर २२.कोवारे २४.पसारा २५.पदर २७.सायास २८.वार २९.टक ३१.समाधान ३४.सागरतट ३८.नर ३९.हरहर ४०.वणवण ४१.खास ४२.नरकवास ४५.हार ४६.कर ४८.पाऊस ४९.लस ५०.टमटमनगरी ५२.वाकडा ५३.आरपार ५४.तन ५५.रान ५६.तीक्ष्ण ५७.वासर ५९.लकवा ६१.मसलत ६३.काक ६४.लवमात्र ६५.सरदार ६७.गवाक्ष ६९.डास ७१.तार ७३.हणमंत ७५.माया ७७.भारवाहक ८१.प्रभाकर ८२.मार ८३.करामत ८४.नायक

### उभे उत्तरे

१.कापडचोपड २.टर ३.कवा ४.सनातन ५.सराफ ७.माघ ८.परभारे ९.परतपरत १०.भरभराट १२.आकाशयान १३.मडके १५.दार १७.कीरवा २१.रद २३.वारसाहक्क २६.रस २७.साधारण ३०.कसकस ३२.मानवता ३३.साहस ३५.गर ३६.टणक ३७.नवरस ४१.खारट ४२.नऊ ४३.रस-वान ४४.वाकडातिकडा ४५.हालह-वाल ४६.कमरकस ४७.जननमरण ४८.पारी ५०.टपाल ५१.मत ५३.आरमार ५५.रातवा ५८.सवतासुभा ६०.वार ६२.लगत ६६.दाहक ६८.क्षमा ७०.सहाय्यक ७२.थोर ७४.मंथरा ७६.यातना ७७.भार ७८.वामा ७९.हर ८०.अंत



# चंदेरी दुनिया

## माझ्यासोबत बेड शेअर कर

### कामाच्या बहाण्याने अभिनेत्रीच्या समोर ठेवलेली अश्लील अट!



'तुला माझ्यासोबत बेड शेअर करावा लागले..', काम देण्याच्या बहाण्याने या टीव्हीच्या प्रसिद्ध अभिनेत्रीला आलेली अश्लील ऑफर. बॉलिवूड आणि छोट्या पडद्यावर नाव कमावलेली अभिनेत्री नेहा पेंडसे आज एक यशस्वी आणि लोकप्रिय कलाकर आहे. पण या यशामागे तिची वर्षानुवर्षांची मेहनत, संघर्ष आणि जिद्द दडलेली आहे. नेहाने अतिशय लहान वयात आपल्या अभिनय कारकिर्दीची सुरुवात केली होती. तिच्या प्रवासातील काही अनुभव ऐकून अनेकांना आश्चर्य वाटेल.

नेहा पेंडसेने एका मुलाखतीत सांगितले की ती चाइल्ड आर्टिस्ट होती आणि तिने अतिशय लहानपणी काम सुरू केले होते. फक्त १० वर्षांची असताना तिला पहिली कमाई म्हणून ५०० रुपये मिळाले. हे पैसे तिने आनंदाने आपल्या आई-वडिलांकडे दिले.

नेहाने सुरुवात केली होती छोट्या पडद्यावरून. कॅप्टन हाउस, पडोसन आणि हसरतें या मालिकांमुळे तिला चांगली ओळख मिळाली. यानंतर ती थेट बॉलिवूडमध्ये पोहोचली आणि 'दाग: द फायर' या चित्रपटात दिसली. या चित्रपटात तिने सनी देओल यांच्या बहिणीची भूमिका साकारली होती. नेहाने केवळ हिंदीतच नाही तर इतर भाषांमध्येही आपली छाप पाडली. ज्यामध्ये तेलुगू, तमिळ आणि मराठी भाषांचा समावेश आहे. तीने काम केलेल्या प्रत्येक भाषेत तिच्या अभिनयाचे कौतुक झाले.

कास्टिंग काउचचा कटू अनुभव

एका मुलाखतीत नेहाने सांगितले की तिच्या करिअरच्या सुरुवातीच्या काळात तिला चुकीच्या हेतूने अश्लील ऑफर देण्यात आली होती. तिला माझ्यासोबत बेड शेअर करावा लागेल अशी ऑफर मिळाली. ज्याला तिने ठाम नकार दिला.

तिने सांगितले की, 'अशा गोष्टी ऐकून खूप दुख होतं, पण मी कधीच हार मानली नाही.' संघर्षाच्या काळात न डगमगणाऱ्या नेहाला कधी काम नव्हते, ऑफर्स मिळत नव्हत्या.

रिश्तेदारांनीही टोमणे मारले

लहान मुलगी आणि चित्रपट लाइनमध्ये काम? योग्य नाही. पण आज तेच लोक म्हणतात, नेहा माझी कजिन आहे, नेहा माझी बहिण आहे. नेहाने हसत हसत सांगितले की काळ बदलला आणि तिचं यश पाहून लोकांची मतंही बदलली. 'भाभीजी घर पर हैं' आणि 'चरू ख ऊेश खप चरवरा?' ने दिला नवा ब्रेक. टीव्हीवर नेहाला प्रचंड लोकप्रियता मिळाली. मे आय कम इन मॅडम? मधील 'मॅडम'ची भूमिका. भाभीजी घर पर हैं मधील विनोदी अंदाज. प्रेक्षकांना फार आवडला.१. नेहा पेंडसेने अभिनयाची सुरुवात कधी केली?नेहाने अतिशय लहान वयात, बालकलाकार म्हणून अभिनयाची सुरुवात केली. फक्त १० वर्षांच्या वयात तिने पहिल्यांदा कमाई केली. २. नेहाची पहिली कमाई किती होती? तिची पहिली कमाई ५०० रुपये होती, जी तिने आई-वडिलांना दिली.

३. नेहेचा पहिला टीव्ही शो कोणता होता? तिचा पहिला शो 'कॅप्टन हाउस' होता. त्यानंतर ती 'पडोसन', 'हसरतें' यांसारख्या मालिकांमध्ये दिसली.

# ...म्हणून धर्मेंद्र यांना कधी सुपरस्टार म्हटलं गेलं नाही! राज ठाकरेंनी सांगितलं खरं कारण

## फडणवीसांनीही व्यक्त केल्या भावना

**राज ठाकरेंकडून सुंदर शब्दात श्रद्धांजली सुपरस्टार का म्हणत नाही हे ही सांगितलं**

**उ्हरीशपवीर ऊ्शरींह ठरक्ष ढ्हरलज्ञशीरू: ज्येष्ठ अभिनेते धर्मेंद्र यांचं निधन झालं आहे. वयाच्या ८९ व्या वर्षी त्यांनी राहत्या घरात अखेरचा श्वास घेतला. थोरला पुत्र सनी देओल याने विलेपार्ले स्मशानभूमीमध्ये मुखाग्नी दिला. अमिताभ बच्चन, सलमान खान, शाहरुख खान, आमिर खान यासारख्या मान्यवरांनी अंत्यसंस्काराला हजेरी लावली. दरम्यान, सोशल मीडियावरुनही धर्मेंद्र यांच्या निधनाबद्दल शोक व्यक्त केला जात असतानाच राजकीय वर्तुळातूनही धर्मेंद्र यांच्या निधनाबद्दल शोक व्यक्त केला जात आहे. राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यासोबतच महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे अध्यक्ष राज ठाकरे यांनीही अत्यंत सुंदर शब्दांमध्ये 'हिमॅन'ला अखेरचा निरोप दिला आहे.**









### फडणवीस काय म्हणाले?

स्वप्नाळू, युवा नायक ते तडफदार-बलंदड नायक म्हणून साकारलेल्या वैविध्यपूर्ण भूमिका आणि पुढे बॉलिवुडचा हि-मॅन म्हणून लौकीक मिळवेलेले ज्येष्ठ अभिनेते धर्मेंद्र चित्रपट रसिकांच्या सदैव स्मरणात राहतील, असे मुख्यमंत्री फडणवीस यांनी म्हटले आहे. भारतीय चित्रपटसृष्टीचा सुवर्णकाळ गाजवणारा लखलखता तारा निखला असंही फडणवीस म्हणाले. शोले चित्रपटातील पडद्यावरील वीरू प्रमाणेच ते प्रत्यक्षातही मैत्र जपणारे होते. सहृदय आणि जुन्या-नव्या पिढीला जोडणारे, अनेकांसाठी आधार, मार्गदर्शक व्यक्तिमत्व म्हणून त्यांची ख्याती होती. या क्षेत्रातील ज्येष्ठत्व ते तितक्याच उमद्यापणाने मिरवत असत. अखेरच्या क्षणापर्यंत ते चित्रपट सृष्टीत सक्रिय राहिले, असं फडणवीस म्हणाले.

धर्मेंद्र हे हिंदी चित्रपटसृष्टीतील एक लोकप्रिय अभिनेता होते, ज्यांचा जन्म ८ डिसेंबर १९३५ रोजी झाला आणि त्यांचे नुकतेच (नोव्हेंबर २०२५) वयाच्या ८९ व्या वर्षी निधन झाले. त्यांनी १९६० मध्ये अभिनय क्षेत्रात पदार्पण केले आणि मशोलेफ चित्रपटातील त्यांच्या भूमिकेसाठी ते विशेष ओळखले जातात. ते एका दशकापासून अधिक काळ हिंदी चित्रपटात होते आणि त्यांनी अनेक यशस्वी चित्रपट दिले आहेत. **पूर्ण नाव:** धर्मेंद्र सिंह देओल (जन्म: ८ डिसेंबर १९३५) पेशा: भारतीय अभिनेता

धर्मेंद्र यांना सुपरस्टार का म्हणत नाही हे राज ठाकरेंनी सांगितलं राज ठाकरेंनी अनेक सुपरहिट सिनेमे दिल्यानंतरही धर्मेंद्र यांना कधी सुपरस्टार का म्हटलं गेलं नाही याबद्दल आपल्या पोस्टमधून सांगितलं आहे. ज्येष्ठ अभिनेते धर्मेन्द्रजींचं निधन झालं. भारतीय सिनेमात 'सुपरस्टार' म्हणलं की त्याच्या झंझावाताचा एक काळ असतो आणि तो ओसरण्याचा पण एक काळ असतो. पण याला अपवाद म्हणजे धर्मेंद्रजी. एकापेक्षा एक सुपरहिट सिनेमे दिले, पण सुपरस्टारचं बिरुद त्यांना चिकटलं नाही म्हणा किंवा त्यांनी चिकटू दिलं नाही. मला चिकटू दिलं नाही असंच जास्त वाटतं, कारण धर्मेन्द्रजींच्या बाबतीत त्यांचं प्रतिमेहून प्रत्यक्ष उत्कट असं होतं. १९६० च्या दशकात धर्मेंद्र नावाचा एक देखणा, शरीराने अतिशय सुदृढ, मोहक हास्य, मर्दानीपणा सहज जाणवत असला तरी त्यात कुठेही दांडगाई नाही, अशा एका व्यक्तिमत्वाचा एक तरुण पडद्यावर झळकला आणि पुढे कित्येक दशकं त्याने हिंदी चित्रपटसृष्टीवर गारुड केलं, असं राज ठाकरे म्हणाले.

सिनेमाच्या खूप गुंतागुंतीच्या जगा-तला...

करिअरच्या सुरुवातीलाच बिमल रॉय यांच्यासारख्या दिग्दर्शकासोबत काम करण्याचं भाग्य कितींच्या वाट्याला येतं? असा सवालही राज यांनी आपल्या पोस्टमध्ये उपस्थित केला. पुढे ऋषिकेश मुखर्जी, चेतन आनंद, रमेश सिप्पी, राज खोसला, मनमोहन देसाई यांच्यासारख्या अनेक दिग्दर्शकांना धर्मेंद्र आपला नायक असावा असं वाटणं यातच धर्मेन्द्रजींच्यातल्या अफाट क्षमतेचं दर्शन होतं. आणि सिनेमाच्या खूप गुंतागुंतीच्या जगातला हा एक सरळ माणूस होता आणि म्हणूनच सर्वसामान्यांनाही तो कायम आपला हिरो वाटत राहिला. त्यांच्या स्मृतीस महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचं विनम्र अभिवादन, असं राज ठाकरेंनी धर्मेंद्र यांना श्रद्धांजली अर्पण करताना म्हटलंय.

# अलविदा ही मॅन



वयाशी संबंधित आजारांमुळे काही दिवसांपासून ते हॉस्पिटलमध्ये उपचार घेत होते. या उपचारांना ते सकारात्मक प्रतिसाद देत असल्यानं त्यांना पुन्हा घरी आणलं गेलं होतं. त्यांच्या प्रकृतीत होत असलेली सुधारणा पाहून चाहतेही खूश होते; पण अखेर काल त्यांनी जगाचा निरोप घेतला. धर्मेंद्र यांच्या निधनानं बॉलिवूडचा ही-मॅन हरपला. धर्मेंद्र यांनी आजवरच्या त्यांच्या कारकिर्दीत अनेक बॉलिवूड सिनेमे केले. त्यांच्या अभिनयानं त्यांनी गेली सहा दशकं प्रेक्षकांचं मनोरंजन केलं. अशाच या हरहुन्नरी अभिनेत्यानं आज निरोप घेतला आहे. त्यांच्या जाण्यानं मनोरंजनसृष्टीत नक्कीच एक पोकळी निर्माण झाली आहे.

धर्मेंद्र यांचे खरे नाव धर्मेंद्र केवल कृष्ण देओल आहे; परंतु चित्रपटांमध्ये प्रवेश केल्यानंतर ते धर्मेंद्र म्हणून ओळखले जाऊ लागले. त्यांचा जन्म ८ डिसेंबर १९३५ रोजी पंजाबमधील लुधियाना जिल्ह्यातील सहनेवाल गावात एका जाट शीख कुटुंबात झाला. त्यांचे सुरुवातीचे शिक्षण लालटन कलान येथे केले. जिथे त्यांचे वडील केवल कृष्ण हे मुख्याध्यापक होते. त्यानंतर धर्मेंद्र यांनी त्यांच्या इंटरमीडिएट शिक्षणासाठी फगवाडा येथील रामगढिया कॉलेजमध्ये प्रवेश घेतला. त्यांनी १२ वी पर्यंत शिक्षण घेतले. त्यांना पुढे शिक्षण घ्यायचे होते, परंतु अभिनयाची त्यांची आवड त्यांना मागे टाकत गेली आणि ते पुढील शिक्षण घेऊ शकले नाहीत.

सिनेमामध्ये काम करण्याचं त्यांचं स्वप्न होतं. एका मासिकाच्या कॉंटेस्टंटसाठी ते मुंबईत आले होते. पण, कलाकार म्हटलं की, संघर्ष हा चुकत नाही.

धर्मेंद्र यांनाही सुरुवातीच्या काळात संघर्ष करावा लागला. तेव्हा त्यांचं मंबईत घर नव्हतं. त्यामुळे ते गॅरेजमध्ये राहिले आणि त्यांनी ड्रिलिंग फर्ममध्ये काम केलं. जिथे त्यांना २०० रुपये मिळायचे आणि थोडे जास्त पैसे कमावण्यासाठी ते ओव्हरटाइम करायचे. पण, शेवटी धर्मेंद्र यांची इच्छा पूर्ण झाली आणि त्यांना कॅमेऱ्यासमोर काम करण्याची संधी मिळाली. त्यांनी कोणत्याही गॉडफादरशिवाय चित्रपटसृष्टीत प्रवेश केला. १९६० मध्ये धर्मेंद्र यांनी 'दिल भी तेरा हम भी तेरे' या चित्रपटातून बॉलिवूडमध्ये पदार्पण केलं. त्यानंतर काही वर्षांनी ते 'बांदनी', 'हकीकत' आणि इतर काही चित्रपटांत झळकले. हळूहळू विविध भूमिका साकारत ते हिंदी चित्रपटसृष्टीतील स्टार बनले. त्यानंतर धर्मेंद्र यांनी कधीच मागे वळून पाहिलं नाही. धर्मेंद्र यांनी 'शोले और शबनम', 'अनपढ' 'शोले', 'सीता और गीता', 'धरम वीर', 'यादों की बारात', 'चरस' आणि 'चुपके चुपके' यासह अनेक हिट चित्रपट दिले. धर्मेंद्र यांचा 'इक्कीस'(खज्ञझळी) चित्रपट लवकरच प्रेक्षकांच्या भेटीला येणार आहे. चाहते हा चित्रपट पाहण्यासाठी खूपच उत्सुक आहेत. नुकताच इक्कीसचा ट्रेलर रिलीज करण्यात आला आहे. वयाच्या ८८ व्या वर्षीपर्यंत ते सिनेइंडस्ट्रीत कार्यरत होते. या वयातही ते सोशल मीडियावर सक्रिय असायचे.

सुरुवातीला धर्मेंद्र एकटेच मुंबईत राहत होते; पण यशस्वी झाल्यानंतर त्यांनी घर खरेदी केलं आणि त्यांच्या आई-वडिलांना

## ज्येष्ठ अभिनेते धर्मेंद्र यांचं वयाच्या ८९ व्या वर्षी निधन

व पहिल्या पत्नी प्रकाश कौर यांना मुंबईत बोलावून घेतलं. धर्मेंद्र यांनी १९ वर्षांचे असताना १९५४ मध्ये प्रकाश कौरशी लग्न केले. त्यांना सनी देओल, बॉबी देओल , अजिता आणि विजेता ही मुलं होती. त्यानंतर त्यांनी १९८० मध्ये हेमा मालिनीशी लग्न केले. चित्रपटांमध्ये काम करताना धर्मेंद्र आणि हेमा मालिनी हे एकमेकांच्या प्रेमात पडले. त्यांना ईशा आणि इहाना अशा दोन मुली आहेत.लुक्स आणि दिसण्याच्या बाबतीत धर्मेंद्र यांना कोणताही अभिनेता टक्कर देऊ शकला नाही. १९७० मध्ये, धर्मेंद्र यांना जगातील सर्वात देखण्या पुरुषाचा पुरस्कारदेखील मिळाला होता. चित्रपटसृष्टीतील त्यांच्या योगदानाबद्दल त्यांना अनेक पुरस्कारांनी सन्मानित करण्यात आले आहे. त्यांना २०१२ मध्ये पद्मभूषण पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. त्यांना राष्ट्रीय पुरस्कार देखील मिळाला आणि फिल्मफेअर जीवनगौरव पुरस्काराने सन्मानित करण्यात आले.

धर्मेंद्र यांच्या निधनानंतर त्यांचे कुटुंबिय, सहकलाकार, अन् चाहतेही भावुक झाले आहेत. धर्मेंद्र यांना भावपूर्ण श्रद्धांजली! बॉलिवूडचे एव्हरग्रीन सुपरस्टार आणि लाखो चाहत्यांच्या हृदयात घर करणारे धर्मेंद्र यांच्या निधनाच्या बातमीने देशभरात शोककळा पसरली आहे. चित्रपटसृष्टीतील या अमूल्य व्यक्तिमत्त्वाच्या जाण्याने सर्वच स्तरांतून शोक व्यक्त केला जात आहे. राजकारणापासून ते मनोरंजन विश्वापर्यंत अनेक दिग्गजांनी धर्मेंद्रच्या आठवणींना उजाळा देत त्यांना भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण केली.ज्येष्ठ अभिनेते आणि माजी खासदार धर्मेद्रजी यांचं निधन भारतीय चित्रपटसृष्टीचं मोठं नुकसान आहे. सर्वात लोकप्रिय अभिनेत्यांपैकी एक असलेल्या त्यांनी त्यांच्या दशकांच्या शानदार कारकिर्दीत अनेक संस्मरणीय कामगिरी केल्या. - राष्ट्रपती **द्रौपदी मुर्मू**

महान अभिनेते धर्मेंद्रजी यांच्या निधनाची बातमी अत्यंत दुःखद आहे आणि भारतीय कला जगताचे कधीही भरून न येणारे नुकसान आहे. **- कॉंग्रेस नेते राहुल गांधी**

आताच्या तरुणाईला कल्पना नसेल पण एक पिढी त्यांच्या लकबीची, त्यांच्या केशभूषेची, वेशभूषेची चाहती होती. 'शोले'मध्ये त्यांनी साकारलेला 'वीरू' आजही घनिष्ठ मैत्रीचं प्रतीक आणि तडफदार नायक म्हणून भारतीय रसिकमनांवर अधिराज्य गाजवतो आहे. - शरद पवार, राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्षाचे प्रमुख

धर्मेंद्र हे त्यांच्या कुटुंबाची काळजी घ्यायचे, त्याचप्रमाणे त्यांच्याशी मैत्री केलेल्या प्रत्येकाची ते काळजी घ्यायचे. त्यांच्यासारखा ग्रेट स्वभावाचा माणूस शोधूनही सापडणार नाही. त्यांनी आज-वर अनेकांना मदत केली आहे. त्यामुळे लोक त्यांच्यावर प्रचंड प्रेम करत असत. मागच्या काही काळापासून आम्ही फोनवरही बोलायचो. काही दिवसांपूर्वी त्यांची तब्बेत बिघडली होती. मला वाटलं की ते बरे होतील. ८ डिसेंबरला ते ९० वर्षांचे झाले असते आणि मी ८१ वर्षांची. पण आता मी माझा वाढदिवस साजरा करणार नाही. **- शर्मिला टागो**रज्येष्ठ अभिनेते धर्मेन्द्रजींचं निधन झालं. भारतीय सिनेमात 'सुपरस्टार' म्हणलं की त्याच्या झंझावाताचा एक काळ असतो आणि तो ओसरण्याचा पण एक काळ असतो. पण याला अपवाद म्हणजे धर्मेंद्रजी. - महाराष्ट्र नवनिर्माण **सेनेचे प्रमुख राज ठाकरे**

'धरमजी यांच्याशी माझे जुने असोसिएशन आहे, १९५८-५९ पासून आम्ही दोघे एकत्र आलो होतो. आम्ही दोघांनी खूप संघर्ष पाहिला आहे आणि साऱ्या गोष्टी कॉमन देखील आहेत. ते एक अद्भुत व्यक्ती आहेत आणि जेव्हा देखील शोले चित्रपटात कुणाला घ्यायचं, हा विचार आला तेव्हा सर्वात पहिल्यांदा धरमजींचा विचार.' - सलीम खान

शब्दच कमी पडतात... सर्वांमध्ये सर्वात देखणा आणि सर्वात छान माणूस. ठखझ धर्मेंद्र तुमच्या प्रवेशाने स्वर्ग आणखी सुंदर होईल!! धरम जी, तुम्ही सुपरस्टार होता आणि बॉलिवूडच्या शेवटच्या दिवसापर्यंत सुपरस्टार रा-हाल. **धर्मेंद्र देओल. - ऊ**

## जुही चावलाने सनी देओलसह किसिंग सीन करण्यास नकार



अलीकडे सिनेमा आणि सीरिजमध्ये किसिंग आणि रोमँटिक सीन अगदी सर्रास दाखवले जातात. मात्र एक काळ असा होता, जिथे अनेक कलाकार मुख्यत: अभिनेत्रींना असे काही सीन करण्यासाठी संकोच वाटत असे. अभिनेत्री जुही चावलालाही पडद्यावर किसिंग सीन करण्यासाठी आधी संकोच वाटला होता. कथेची गरज म्हणून तिनं तो सीन केला; पण दिग्दर्शकानं तिला पुन्हा तो सीन करण्यासाठी सांगताच अभिनेत्रीनं त्यांना एक आठवण करून दिली.१९९० च्या सुरुवातीला जुही चावला आणि 'कयामत से कयामत तक'मधील तिचा सहकलाकार आमिर खान यांची जोडी लोकप्रिय होती; पण त्याहूनही 'डर' चित्रपटातील शाहरुख खान आणि सनी देओल यांच्याबरोबरची तिची जोडी चांगलीच गाजली. त्या वर्षात यश चोप्रांचा हा रोमँटिक सिनेमा रिलीज झाला होता. त्याच वर्षी जुहीनं धर्मेश दर्शन दिग्दर्शित 'लूटेरे'मध्येही सनी देओलसह काम केलं होतं.याच 'लूटेरे'बद्दल निर्माते सुनील दर्शन सांगतात, 'लूटेरे' हा जुही चावलाच्या कारकिर्दीतील महत्त्वाचा चित्रपट आहे. मी तिचा पहिला चित्रपट ???सुल्तानत (की- सल्तनत)??? (१९८६) आणि कयामत से कयामत तक (१९८८) हे दोन्ही चित्रपट वितरित केले होते. जुहीमध्ये प्रचंड क्षमता होतीआणि म्हणूनच आम्ही तिला 'लूटेरे'साठी निवडले होते. मात्र, या चित्रपटातील नायिकेची 'पाश्चिमात्य शैली' पाहून तिला थोडी शंका आली होती.ते म्हणाले, ङ्गएका बीचवरील गाण्यात तिला फक्त एक शर्ट घालून पाण्यात भिजायचं होतं. त्यामुळे तिला काही शंका होत्या. त्या काळात दिव्या भारती झपाट्यानं लोकप्रिय होत होती आणि तीही हा चित्रपट करायला उत्सुक होती; पण ती या भूमिकेत नीट बसत नाही, असं आम्हाला वाटलं. त्यामुळे शेवटी धर्मेशजी आणि माझ्या मते, जुहीच सर्वांत योग्य ठरली आणि या चित्रपटात तिचं कास्टिंग झालं. सुनील दर्शन पुढे म्हणतात, ङ्गजुहीची प्रतिमा साध्या, निरागस मुलीसारखी होती. ङ्गलूटेरेफ्मध्ये तिच्याकडून थोडी ग्लॅमरस भूमिका अपेक्षित होती आणि त्यामुळे ती गोंधळलेली होती; पण ती भूमिका करण्यास तयारही होती. आता ते सगळं मजेशीर वाटतं; पण त्या वेळचा एक गमतीशीर अनुभव सांगायचा म्हणजे आम्ही तिला चित्रपटाची कथा सांगितली आणि करारही केला. या चित्रपटात जुही आणि सनी यांच्यात एक लिप-टू-लिप किसिंग सीन होता. तो सीन आम्ही शेवटी ठेवला होता. सेट तयार होता; पण त्या दिवशी आम्हाला कळलं की, जुही शूटला आलीच नव्हती.मोबाईल हातात आला की उंदरासारखेः, जया बच्चन यांची पापाराझींबद्दल स्पष्ट प्रतिक्रिया; म्हणाल्याः सुनील सांगतात की, जुहीनं त्या दिवशी उदयपूरमध्ये तिच्या दुसऱ्या चित्रपटाचं शूट असल्याचं कारण देऊन हा सीन टाळला; पण सुनील यांनी हा सीन पूर्ण करणं आवश्यक असल्याचं सांगून नंतर पुन्हा त्याचं शूटिंग केलं. त्यांच्या मते, या किसिंग सीनची कथेमध्ये महत्त्वाची भूमिका होती. सुनील यांनी धर्मेश यांना हा सीन एकाच टेकमध्ये शूट करण्यासाठी मल्टी-कॅमेरा सेटअप वापरण्याचा सल्ला दिला. सीन संपताच जुही लगेच एक गाऊन घालून निघून गेली. मात्र दिग्दर्शकांना वाटलं की, याचा आणखी एक टेक व्हावा. सुनील यांनी जेव्हा जाहीर केलं की, री-टेक करावा लागेल, तेव्हा जुही म्हणाली, ङ्गदर्शनसाहेब, करारानुसार मला एक किस करायचा होता. तो मी आधीच केला आहे. त्यावर सुनील हसत म्हणाले, ङ्गआज हे सगळं अगदी बालिश वाटतं; पण ते खूप गोड होतं.

दिग्गज अभिनेते धर्मेंद्र यांच्या ८९व्या वर्षी झालेल्या निधनानं संपूर्ण चित्रपटसृष्टी शोकात बुडाली. अनेक दशकं चाहत्यांच्या मनावर राज्य करणाऱ्या या सुपरस्टारच्या शेवटच्या क्षणांत त्यांच्या सोबत मुलं आणि पत्नी हेमा मालिनी खंबीरपणे उभे होते. त्यांचं कुटुंब अजूनही या दुःखातून सावरू शकलेलं नाही. अशातच, धर्मेंद्र यांच्या निधनानंतर तीन दिवसांनी हेमा मालिनी यांनी अखेर आपल्या भावना व्यक्त केल्या. आयुष्यभर साथ देणाऱ्या जोडीदाराच्या आठवणी सांगताना त्यांनी भावनिक शब्दांत आपलं दुःख व्यक्त केलं आणि त्यांच्या सहवासाच्या क्षणांना उजाळा दिला. त्या म्हणतात -धरमजी, ते माझ्यासाठी खूप काही होते. प्रेमळ पती, ईशा आणि अहानाचे आदर्श वडील, मित्र, तत्त्वज्ञ, मार्गदर्शक, कवी आणि आयुष्यातील प्रत्येक कठीण क्षणी 'ज्याच्याकडे मी धाव घेई' असे माझे सर्वस्व! ते नेहमीच माझ्या कुटुंबाशी आत्मीयतेने वागले, प्रेम आणि समभावाने प्रत्येकाला आपलंसं केलं. कलाकार म्हणून त्यांचं अपार कसब, प्रचंड लोकप्रियतेनंतरही असलेली नम्रता आणि सार्वत्रिक आकर्षण यामुळे ते खऱ्या अर्थाने अद्वितीय आयकॉन होते. माझं वैयक्तिक दुःख शब्दांत व्यक्तच होऊ शकत नाही, त्यांच्याविना आयुष्यात निर्माण झालेली पोकळी कायमच राहील. आयुष्यभराच्या सहवासानंतर आता फक्त असंख्य आठवणी उरल्या आहेत

## ते माझ्यासाठी सर्वकाही होते - हेमा मालिनी





## महापारेषणमध्ये अनुसूचित जाती आयोगाची आढावा बैठक





**मुंबई/प्रतिनिधी :** महाराष्ट्र राज्य अनुसूचित जाती आयोग, मुंबईचे उपाध्यक्ष तथा सदस्य (सचिव दर्जा) ॲड. धर्मपाल मेश्राम यांनी महाराष्ट्र राज्य विद्युत पारेषण कंपनीमध्ये (महापारेषण) आढावा बैठक घेतली.

वांद्रे येथील प्रकाशगंगा या मुख्य कार्यालयात आयोजिलेल्या या बैठकीत अनुसूचित जाती जमातीतील अधिकारी व कर्मचाऱ्यांच्या तक्रारी, निलंबन व पदोन्नतीबाबत आढावा घेतला. अनुसूचित जाती व जमातीच्या रिक्त पदांची माहिती घेत लाडपागे प्रकरणाबाबत मागील दहा वर्षाचा आढावा घेतला. तसेच अनुकंपा प्रकरणाबाबतही माहिती घेतली. बाह्यस्त्रोताव्दारे अनुसूचित जाती जमाती कर्मचाऱ्यांच्या योजना व उपाययोजनाकरिता महापारेषण यांना विनियोगकरिता असलेल्या निधीचा मागील पाच वर्षांचा आढावा घेतला. महापारेषणकडून अनुसूचित जाती जमातीसाठी महापारेषणमार्फत राबविण्यात येणाऱ्या संपूर्ण माहिती घेऊन अन्य प्रश्नांवर त्यांनी सविस्तर आढावा घेतला. या बैठकीला महापारेषणचे संचालक (प्रकल्प) श्री. अविनाश निंबाळकर, महाव्यवस्थापक (मानव संसाधन) श्री. राजू गायकवाड, उपमहाव्यवस्थापक (मानव संसाधन) श्री. नितीन कांबळे, सहाय्यक महाव्यवस्थापक (मानव संसाधन) श्री. राघवेंद्र पुजारी, राजशिष्टाचार अधिकारी श्री. सतिश जाधव, वरिष्ठ व्यवस्थापक श्री. पारस सवाई यांच्यासह अन्य अधिकारी उपस्थित होते.

## शिवलिंगेश्वर फार्मसीचे विद्यापीठस्तरीय अन्वेषण २०२५-२६ संशोधन स्पर्धेत घवघवीत यश

**औसा/प्रतिनिधी :** तालुक्यातील आलमला येथील श्री विश्वेश्वर शिक्षण प्रसारक मंडळ संचलित शिवलिंगेश्वर कॉलेज ऑफ फार्मसी महाविद्यालयातील बी. फार्मसी व फार्म. डी अभ्यासक्रमाच्या विद्यार्थ्यांनी स्वामी रामानंद तिर्थ मराठवाडा विद्यापीठ आयोजित विद्यापीठ स्तरीय विद्यार्थी संशोधन अधिवेशन अन्वेषण संशोधन प्रकल्पात सहभाग नोंदवुन प्रभावीपणे सादरीकरणाद्वारे प्रथम, द्वितीय व तृतीय क्रमांकाचे मानांकन मिळविले.

स्वामी रामानंद तिर्थ मराठवाडा विद्यापीठाचे कुलगुरु डॉ. मनोहर चासकर यांच्या शुभहस्ते व प्रमुख पाहुणे डॉ. अशोक महाजन नवसंशोधन व साहचर्य मंडळाचे संचालक डॉ. शैलेश वाढेर, औषधनिर्माणशास्त्र संकुलाचे संचालक डॉ. एस.एस. पेक्कमवार, डॉ. एच.एस. फडेवार, डॉ. वसंत वाघ, डॉ. बाबुराव जाधव यांच्या उपस्थितीत विजेत्या विद्यार्थ्यांना सन्मानपत्र देऊन गौरविण्यात आले.

भारतीय विद्यापीठ संघाद्वारे देशभर राबविण्यता येणारा अन्वेषण हा उपक्रम विद्यार्थ्यांमध्ये संशोधन संस्कृती जोपासण्यासाठी अत्यंत प्रेरणादायी ठरत असल्याचे मत कुलगुरु डॉ. मनोहर चासकर यांनी व्यक्त केले. शिवलिंगेश्वर कॉलेज ऑफ फार्मचीच्या विद्यार्थ्यांनी यामध्ये विशाल वाडेकर, अचल मुलगीर, गौतम दुर्गम, सोफिया पठाण, अस्मिता इंगळे, गायत्री वाघमारे, साक्षी चामे, संजीवनी फुले, मयुरी थोटे, संजना गुप्ता, अजीज बागवान या विद्यार्थींनी कृषी, मुलभूत विज्ञान, अभियांत्रिकी तंत्रज्ञान, समाजशास्त्र या प्रमुख विभागा अंतर्गत संशोधन प्रकल्पाचे प्रभावीपणे सादरीकरण करुन प्रथम, द्वितीय व तृतीय क्रमांकाचे मानांकन मिळविले.

प्रथम क्रमांकाच्या मानांकनासाठी निवड झालेल्या विद्यार्थ्यांना आगामी बेस्ट झोन अन्वेषण स्पर्धेत सरदार पटेल विद्यापीठ आंनद गुजराथ येथे विद्यापीठाचे प्रतिनिधीत्व करण्याची संधी मिळणार आहे. या सर्व यशस्वी विद्यार्थ्यांना महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. विश्वेश्वर धाराशिवे, अन्वेषण समन्वयक प्रा. विद्या कापसे (येलम) यांचे सखोल मार्गदर्शन लाभले. वरील सर्व यशस्वी विद्यार्थ्यांचे अभिनंदन संस्थेचे अध्यक्ष शिचरण धाराशिवे, उपाध्यक्ष प्रभाकर कापसे, सचिव बसवराज धाराशिवे,सहसचिव महादेव खिचडे, महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. विश्वेश्वर धाराशिवे, योगेश धाराशिवे व दगडोजीराव देशमुख डी. फार्मसी कॉलेज चे प्राचार्य डॉ. कैलास कापसे, सर्व विभाग प्रमुख, प्राध्यापक व कर्मचारी यांनी केले.

# जनतेला फक्त बॅनरबाजी आणि फुशारक्या दाखवण्यात आल्या काम मात्र शून्य अशी टिका; माजी आमदार धिरज देशमुख

### नागरिकांच्या न्याय हक्कासाठी काँग्रेस काम करणार, मतदारांनी साथ द्यावी- माजी आमदार धिरज विलासराव देशमुख यांचे आवाहन

**रेणापूर/प्रतिनिधी :** रेणापूर नगरपंचायतीतील प्रलंबित विकासकामे, त्यासाठी आलेल्या निधीचा अपव्यय, भ्रष्टाचार आणि निवडणूक प्रक्रियेत भाजपकडून होत असलेल्या दबाव तंत्रांविरोधात शनिवारी (दि. २९ ) माजी आमदार धिरज विलासराव देशमुख यांनी पत्रकार परिषदेत सविस्तर भूमिका मांडली व विकास कामात झालेल्या नगरपंचायतीच्या भ्रष्ट कारभारावर थेट सवाल उपस्थित करून निवडणुक काळात भाजपकडून होत असलेल्या डावपेचांवर जोरदार प्रहार करून भाजपच्या नगरअध्यक्ष पदाच्या उमेदवाराचे घर सरकारी जमिनीवर असल्याचा गंभीर आरोप देशमुख यांनी केला.



माजी आमदार धीरज विलासराव देशमुख यांनी शनिवारी (दि.२९ ) भाजपच्या नगराध्यक्ष पदाच्या उमेदवाराचे घर सरकारी जमिनीवर असून हे प्रकरण शासकीय यंत्रणेला गोंधळात टाकून, त्यांच्यावर दबाव आणून हा प्रकार दडपण्याचा प्रयत्न झालेला आहे. नगर पंचायतीची निवडणूक प्रक्रिया सुरू असताना निवडणुक आयोगाने वारंवार बदलाची भूमिका घेतली असून निवडणुका पारदर्शक व निष्पक्ष व्हाव्यात यासाठी काँग्रेस पक्ष सज्ज आहे, मात्र भाजप दबाव तंत्राचा वापर करत आहे, रेणापूर नगरपंचायत भाजपच्या हातातून जाणार हे त्यांना जाणवत आहे. म्हणूनच ते कटकारस्थान, अफवा व दिशाभूल करण्याचे प्रयत्न करीत आहेत, रेणापूरच्या विकासासाठी भाजपकडून ११२ कोटींचा निधी आणल्याचा दावा करण्यात आला. तो निधी कोठे वापरला याबाबत माहिती अधिकारातून काही लोकांनी माहिती घेतली असता हा पैसा कुठे खर्च झाला याचे स्पष्टीकरण त्यांना मिळत नाही.जनतेला फक्त बॅनरबाजी आणि फुशारक्या दाखवण्यात आल्या. काम मात्र शून्य अशी टिका माजी आमदार धिरज देशमुख यांनी केली. सार्वजनिक शौचालय, पाणी, स्वच्छता व अर्धवट कामांवर लाखो खर्च करून जनतेची फसवणूक केली असुन विंधन विहीर, वॉकिंग ट्रॅकसाठीचा निधी ,नगरपंचायत इमारत बांधकाम, स्वच्छता व कचरा व्यवस्थापन, घंटा गाड्या यासाठी ८६ लाखांची तरतूद करूनही शहरात स्वच्छता नावाची गोष्ट नाही. प्रत्येक गल्लीमधून मोकाट जनावरांचे साम्राज्य दिसून येते, शादीखान्यासाठी मंजूर केलेले दोन कोटी, त्याचे झालेले दोन वेळा उद्घाटन,रेणा नदी घाटासाठीचा तीन कोटींचा निधी,यावर शंका उपस्थित करून बॅनरबाजी व केवळ सोशल मीडियावर घोषणाबाजी केली जात आहे असा गंभीर आरोप देशमुख यांनी केला.

**रेणापूर नगर पंचायतीच्या गेल्या ५ वर्षाच्या काळात कचरा व्यवस्थापनावर लाखो रूपयांचा खर्च केला असुन त्यावर ४५ कामगार स्वच्छतेचे काम करीत असल्याचे नगरपंचायतीच्या रेकार्ड वरून दिसते. आमची सत्ता आल्यास हे चित्र बदलून घंटा गाडी व स्वच्छता मजुराकडून काम करून घेवु असे माजी आ. धिरज देशमुख म्हणाले.**

तसेच २०२२ मध्ये महाविकास आघाडी सरकारने ८ कोटींची पाणीपुरवठा योजना मंजूर केली होती. जनतेच्या हक्काची कामे भाजपने अडवली. केवळ आकसापोटी विकास रोखला असे सांगुन नदीघाट, शादीखाना, महात्मा गांधी पुतळा अशी

अनेक विकास कामे मुद्दाम प्रलंबित ठेवण्यात आली, असा आरोप करून भाजपच्या अपयशी कारभाराला आता जनता कंटाळली आहे. रेणापूरच्या विकासासाठी जनता काँग्रेससोबत उभी आहे. आगामी नगरपंचायतची निवडणूक हि परिवर्तनाची होईल यात शंका नाही. असे माजी आमदार धिरज देशमुख यांनी पत्रकार परिषदेत सांगितले.या वेळी माजी आमदार वैजनाथ शिंदे, ॲड .किरण जाधव, माजी जि प.अध्यक्ष संतोष देशमुख, पक्ष निरीक्षक सचिन पाटील,नगराध्यक्ष पदाच्या उमेदवार अर्चना प्रदिप माने व १७ प्रभागातील नगरसेवक पदाचे सर्व उमेदवार यांच्यासह काँग्रेस पदाधिकारी उपस्थित होते.

## मुख्यमंत्री देवा भाऊंचे विश्वासु ॲड. स्वप्नील व्हते यांना निवडून द्या. - माजी मंत्री संभाजी पाटील निलंगेकर

**अहमदपूर/प्रतिनिधी:** अहमदपूर नगर परिषदेची निवडणूक भाजप संपूर्ण ताकतीने लढून जिंकणार आहे.महायुती म्हणून राष्ट्रवादी सत्तेत असली तरी सरकार च्या तिजोरीची मास्टर चावी भारतीय जनता पक्षाकडे आहे. नगराध्यक्ष पदाचे उमेदवार ॲड.स्वप्नील व्हते व भाजपाच्या सर्व उमेदवारांना निवडून द्या.अहमदपूर शहराला पाहिजे तेवढा निधी देण्याची हमी माजी मंत्री आ. संभाजी पाटील निलंगेकर यांनी दिली. अहमदपूर शहरासह तालुक्यात भारतीय जनता पक्षाला माणनारा वर्ग मोठ्या प्रमाणात आहे. राष्ट्रवादीच्या मंत्र्यांनी अहमदपूर शहरासाठी जे जे अश्वासन दिली आहेत.त्याच्या दहा पटीने जास्त निधी अहमदपूर नगर परिषदला देऊ. स्वप्नील व्हते हे महीलाचे व शहरवासीयांचे रक्षक म्हणून काम करणार आहेत. अहमदपूर नगर परिषदेवर भारतीय जनता पक्षाचा झेंडा फडकवण्याचा निर्धार यावेळी माजी मंत्री संभाजी पाटील निलंगेकर यांनी व्यक्त केला.



लाडकी बहीण योजना ही मुख्यमंत्री देवेंद्रजी फडणवीस यांनी चालू केली असून थोड्याच दिवसात लाडक्या बहीणीला दिड हजारांहून एकविसे रुपये भाजपाचे सरकार करणार आसून लाडक्या बहीणी ला लखपती करण्याचा मानस मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचा असल्याचे यावेळी संभाजी भैय्या पाटील निलंगेकर यांनी सांगितले.

अहमदपूर शहरातील मेन रोड वरील आझाद चौकात भारतीय जनता पक्षाच्या उमेदवारांच्या प्रचारार्थ जाहीर सभेचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी अहमदपूर नगर परिषद निवडणुकीचे प्रमुख गणेश दादा हाके पाटील, भाजपाचे माजी जिल्हाध्यक्ष दिलीपराव देशमुख,माजी आमदार बब्रुवान खंदाडे,माजी नगराध्यक्ष ॲड.भारत चामे, राजकुमार मजगे,माजी सभापती अशोक काका केंद्रे,माजी जिल्हा परिषद सदस्य त्रंबक आबा गुट्टे, कपील माकणे नगराध्यक्ष पदाचे उमेदवार ॲड.स्वप्नील व्हते यांनी जाहीर सभेत मनोगत व्यक्त केले.

यावेळी व्यासपीठावर बसवराज पाटील कौळखेडकर, माजी सभापती सौ. अयोध्याताई केंद्रे, वसंत डिगोळे, जिवणकुमार मद्देवाड, सभापती निळकंठ मिरकले,सज्जन लोणाळे,अहमदपूर नगर परिषद निवडणुकीचे प्रचार प्रमुख गोविंद गिरी,सिद्धेश्वर पवार ,हेमंत गुट्टे, रामानंद मुंडे,ज्ञानोबा बडगिरे,नितीन रेड्डी,रणजित मिरकले,रोहिदास वाघमारे, चाकुरचे उपनगराध्यक्ष साई हिप्पाळे,स्वयंप्रकाश हांगे,मणीषा नवणे, प्रताप पाटील,नगराध्यक्ष पदाचे उमेदवार ॲड. स्वप्निल व्हते, यांच्या सह नगरसेवक पदाचे सर्व उमेदवार अहमदपुर व चाकूर तालुक्यातील भारतीय जनता पक्षाचे सर्व पदाधिकारी व कार्यकर्त नगर सेवक पदाचे सर्व उमेदवार यांच्या सह अहमदपूर शहरातील मतदार मोठ्या संख्येने उपस्थित होते.सदरील बैठकीचे सुत्रसंचालन गोविंद गिरी यांनी करून अभार मानले.

# सत्ता, पैसा आणि दडपशाहीचा अहंकार मोडून काढा

### गंगाखेड नगर परिषदेत काँग्रेस-राष्ट्रवादी आघाडीला विजयी करण्याचे आमदार अमित देशमुख यांचे आवाहन

**लातूर/प्रतिनिधी :** भ्रष्टाचारमुक्त, पारदर्शक, आणि सर्वसमावेशक कारभार करून, गंगाखेड शहराचा सर्वांगीण विकास साधण्यासाठी काँग्रेस, राष्ट्रवादी काँग्रेस (शरद पवार) आघाडीच्या नगराध्यक्ष व नगरसेवक पदाच्या सर्व उमेदवारांना मोठ्या मताधिक्याने विजय करावे, असे आवाहन सकाळी गंगाखेड येथे आयोजित प्रचारसभेत बोलताना राज्याचे माजी वैद्यकीय शिक्षण व सांस्कृतिक कार्यमंत्री, आमदार अमित विलासराव देशमुख यांनी केले.

परभणी जिल्ह्यातील गंगाखेड नगरपरिषद निवडणुकीतील काँग्रेस आणि राष्ट्रवादी काँग्रेस (शरद पवार) आघाडीच्या उमेदवारांच्या प्रचारार्थ आज सकाळी गंगाखेड शहराच्या मध्यवर्ती ठिकाणी आयोजित केलेल्या प्रचार सभेत जनतेशी संवाद साधला यावेळी ते बोलत होते.

या प्रचार सभेस माजी खासदार तुकाराम रेंगे पाटील, माजी आमदार सुरेश देशमुख, काँग्रेस पक्षाच्या एससी सेलचे प्रदेशाध्यक्ष सिद्धार्थ हत्तीअंबीरे, राष्ट्रवादी काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष अजय गव्हाणे, श्री इनामदार, काँग्रेस पक्षाचे तालुका अध्यक्ष गोविंद यादव, शहराध्यक्ष युनुस शेख यांच्यासह अनेक मान्यवर यावेळी व्यासपीठावर उपस्थित होते, या सभेला गंगाखेडच्या जनतेकडून उस्फूर्त प्रतिसाद मिळाला.

दक्षिणेतील काशी आणि संत जनाबाईंचे जन्मस्थळ म्हणून ओळख असलेल्या परभणी जिल्ह्यातील गोदाकाठचे गंगाखेड हे सामाजिक एकोपा जपणारे शहर आहे, असून या शहराने कायम काँग्रेस पक्षाला साथ दिली असल्याचे यावेळी बोलताना माजी मंत्री, आमदार अमित विलासराव देशमुख यांनी नमूद केले.

राज्यात आणि देशात सध्या सत्तेतून पैसा आणि पैशातून सत्ता मिळवणाऱ्या मंडळींनी एकाधिकारशाही चालवली आहे, गंगाखेड मध्येही हे लोन आता येऊन पोहोचले आहे, लोकांचा कितीही विरोध असला तरी दडपशाही आणि पैशाचा जोरावर आपण निवडणुका जिंकू शकतो असे सत्ताधाऱ्यांना वाटू लागले आहे, त्यांचा हा अहंकार मोडीत काढण्याची संधी नगरपरिषद निवडणुकीच्या निमित्ताने आपणाला मिळालेली आहे. सर्वधर्मसमभाव मांडणाऱ्या काँग्रेस राष्ट्रवादी काँग्रेस ( शरद पवार) आघाडीने येथे नगराध्यक्ष पदासाठी उजमामाई युनुस शेख या सुशिक्षित युवतीला उमेदवारी दिली असून नगरसेवक पदासाठीही कार्यक्षम उमेदवार दिले आहेत असे यावेळी माजी मंत्री, आमदार अमित विलासराव देशमुख यांनी सांगितले.



शहरात राबविण्यात येणाऱ्या योजनांसाठी मंजूर निधी त्याच ठिकाणी खर्च करून दर्जेदार कामे करण्याची हमी काँग्रेस राष्ट्रवादी आघाडीच्या वतीने देण्यात येत आहे, त्यामुळे कोणत्याही आमिषाला बळी न पडता, निर्भयपणे हाताचा पंजा आणि आणि तुतारी या चिन्हा समोरील बटन दाबून काँग्रेस उमेदवारांना विजयी करावे असे आवाहन शेवटी माजी मंत्री, आमदार अमित विलासराव देशमुख यांनी केले.

## चन्नबसवेश्वर फार्मसी कॉलेजमध्ये राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० अंतर्गत सेमिनार संपन्न

**लातूर/प्रतिनिधी :** २८ नोव्हेंबर २०२५ रोजी, चन्नबसवेश्वर फार्मसी महाविद्यालय (डिग्री), लातूर येथे आयक्यूएसी आणि इस्कॉन लातूर यांच्या संयुक्त विद्यमाने राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० अंतर्गत ''भारतीय ज्ञान प्रणाली : मूल्याधिष्ठित शिक्षणाचे महत्त्व'' या विषयावर सेमिनार आयोजित करण्यात आला.



या सेमिनारमध्ये अतिथी मार्गदर्शक श्री. योगीराज बाहेती (इस्कॉन, लातूर) यांनी राष्ट्रीय शैक्षणिक धोरणामुळे शिक्षण व्यवस्थेत होत असलेल्या सकारात्मक बदलांवर प्रकाश टाकला. भारतीय ज्ञान परंपरा ही केवळ माहितीपुरती मर्यादित नसून जीवनमूल्ये, चारित्र्यनिर्मिती व सर्वांगीण विकासाचे तत्त्वज्ञान असल्याचे त्यांनी विद्यार्थ्यांना सांगितले. आधुनिक शिक्षण व्यवस्थेत मूल्याधारित शिक्षणाचे वाढते महत्त्व त्यांनी उपस्थितांना समजावून सांगितले.

कार्यक्रमास पंचाक्षरी शिवाचार्य ट्रस्टचे सचिव श्री. भीमाशंकर देवनीकर, विश्वस्त श्री. विजयकुमार मठपती, श्री. अरुण हालकुडे, तसेच महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. विजयेंद्र स्वामी, नॅक समन्वयक व संशोधन विभाग प्रमुख डॉ. ओमप्रकाश भुसनुरे, आयक्यूएसी समन्वयक डॉ. अनंत देशपांडे, कार्यक्रम समन्वयक प्रा. अविनाश मठपती, प्रा. महेश मानके, राष्ट्रीय सेवा योजना समन्वयक प्रा. भीमाशंकर हुच्चे, प्रा. प्रतिभा ठावरे, प्रा. प्रियंका तेलंग, यांच्यासह विविध विभागांचे प्रमुखही उपस्थित होते.

कार्यक्रमाचे सुत्रसंचालन प्रा. अश्विनी भारती तर आभारप्रदर्शन प्रा. अविनाश मठपती यांनी केले. या सेमिनारच्या यशस्वितेसाठी प्रा. स्नेहल जोगदंड, प्रा. प्राजक्ता केळगावकर, श्री. शिवहार विभुते, श्री. सिद्धेश्वर स्वामी, श्री. अक्षय खंडापुरे, श्री. दर्शन भोसगेकर, श्री. शशिकांत स्वामी, तसेच महाविद्यालयातील सर्व शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी यांनी परिश्रम घेतले. कार्यक्रमाची सांगता राष्ट्रगीताने करण्यात आली. विद्यार्थ्यांच्या उत्स्फूर्त सहभागामुळे हा सेमिनार सर्वांसाठी प्रेरणादायी व मार्गदर्शक ठरला.

प्रो. जडे यांचे रबरी शिक्के
कॉम्प्युटर नॉयलॉन रबर असलेले
टिकाऊ रबरी शिक्के
तयार करून मिळतील.



शाखा १.
जडे-भारत प्रिंटींग प्रेस, मेनरोड, लातूर
शाखा २.
जडेऑफसेट प्रिंटर्स, मित्र नगर, लातूर
संपर्क: (०२३८२) २४२६०८,२४५४०९

# मतदारांचा अंदाज येत नसल्याने उमेदवारांची होतेय दमछाक..!

धाराशिव (प्रतिनिधी)-सर्वच वॉर्डात नगराध्यक्षपदाचे उमेदवार पायाला भिंगरी लावून पळत आहेत. शहराच्या विकासाचे मॉडेल सादर करीत आहेत. आजपर्यंत झालेल्या कामापेक्षाही अधिक चांगले काम करण्याचे 'वचन' मतदारांना देत आहेत; मात्र मतदार आपल्या मनाचा अंदाज कोणालाच लागू देत नसल्याने सर्वच इच्छुक उमेदवारांची सध्या तरी भंबेरी उडाल्याचे चित्र आहे.

आम्हाला गृहीत धरु नका. आम्ही विचार करुनच मतदान करीत असतो, असा मेसेज मतदार त्याच्या वर्तनातून देत आहेत. त्यामुळे प्रत्येक दारात जाऊन मतदारांसमोर लोंटागण घालण्याची वेळ सर्व उमेदवारांवर आली आहे. प्रत्येक पक्षाचे उमेदवार आजपर्यंत आम्ही कसे चांगले काम केले आहे, भविष्यात शहराचा चेहरामोहरा बदलणार आहोत, त्याची ही ब्लू प्रिंट आहे, असे सांगत मतदारांना आपलेसे करण्याचा प्रयत्न करीत असले तरी मतदारा मात्र प्रत्येक उमेदवाराला आम्ही तुमचेच आहोत. विनयशीलता याचा तुम्हालाच मतदान करु, असे सांगत आहेत. राजकारणी लोकांची निवडणूक काळातील वर्तणूक, अंदाज मतदारांना पूर्णपणे आलेला आहे. त्यामुळेच मतदारही आपली झाकली मूठ सव्वा लाखाची ठेवत आहे.

अजून दोन तारखेला खूप वेळ आहे. पाहू तेव्हाच, असे सांगत अनेक मतदार उमेदवारांना आल्या पावली माघारी पाठवत आहेत. एकतर्फी निवडणूक कोणासाठीच नाही..! जिल्ह्यातील धाराशिव, तुळजापूर, कळंब, उमरगा, भूम, परंडा, मुरुम आणि नळदुर्ग या आठ नगरपालिकांची निवडणूक होत आहे.

# ऊसतोडणी मजुरांसोबतच्या चिमुरड्यांची फरपट; लहान मुलांची शिक्षणाची आबाळ

धाराशिव (प्रतिनिधी)-शासनाने साखरशाळा, शाळाबाह्य विद्यार्थ्यांसाठी नजीकच्या शाळेत व्यवस्था आदींच्या माध्यमातून विद्यार्थी शिक्षणापासून वंचित राहणार नाही, यासाठी प्रयत्न केले. परंतु, भूम तालुक्यातील ईट परिसरात ऊसतोडणी मजुरांसोबत अनेक शालेय विद्यार्थी शाळा सोडून उसाच्या फडात जुंपलेली दिसत आहेत.

सध्या सर्वत्र उसतोडणी हंगाम सुरू आहे. ईटसह परिसारातील आंदुड, लांजेश्वर, डोकेवाडी, पांढरेवाडी, निपाणी, गिरवली आदीसह गावांमध्येही ही तोडणी सुरू आहे. या तोडणीसाडी कोठे गावटोळी तर कोठे बाहेरच्या गावातील ऊसतोड कामगार उसाच्या फांमध्ये तोडणी करताना दिसून येत आहेत. मात्र, बाहेरून आलेल्या ऊसतोड कामगारांची लहान मुले-मुली त्यांच्याबरोबरच असल्याचे चित्र दिसून येत आहे.

यामुळे या लहान मुलांची शिक्षणाची आबाळ होत आहे. अनेक मुलांचे कित्येक वर्षे त्यांच्या आई वडिलासोबत निघून जातात आणि शेवटी मोठे झाल्यावर तेही या कामात जुंपून घेतात, असे हे चक्र सुरू आहे. या मुलांच्या शिक्षणासाठी असलेल्या साखरश ाळांची संबंधितांकडून व्यवस्था होत नसल्यामुळे या मुलांच्या शिक्षणाचे भवितव्य अंधारात हेलकावे खात आहे. ईटसह

परिसरातील आंद्रूड, लांजेश्वर, निपाणी, डोकेवाडी आदी गावांत ऊसतोडणी जोरात चालू आहे. या ऊस तोडणीसाठी गावातील व काही जोतीबाचीवाडी, नागेवाडी, पखरुड आदी गावातील शेतकरी आपल्या जनावरांना चारा म्हणून उस तोडणीसाठी येत आहेत.

शासनाने ऊसतोडीच्या काळात विस्थापित होणाऱ्या हजारोंच्या संख्येतील कामगारांच्या संख्येमुळे त्यांच्या पाल्यांची शिक्षणाची गैरसोय होऊ नये यासाठी साखरशाळा सुरू केल्या. परंतु, या शाळा कोठे आहेत, याचा थांगपत्ताच नाही.

परिणामी आपले आई-वडील उस तोडणीसाठी आल्यामुळे त्यांना हि त्यांच्या बरोबर आपले उद्या चे भविष्य सोडून व शिक्षण सोडून यावे लागत आहे. उस हंगामा हा तीन ते चार महिने चालतो. त्यामुळे या चिमुकल्या चार ते पाच महिने वही व पेन आणि आपल्या शाळेसह शिक्षकांची भेट होत नाही.

रोजगारासाठी विस्थापित होणाऱ्या भागात मजुरांच्या पाल्यांसाठी साखरशाळा गरजेच्या आहेत. गिरलगाव, मुंगेवाडी, पखरुड या ची तालुक्यातील गावांसह हिंगोमुलली धुळे, नंदुरबार जिल्ह्यातील तसेच राज्यच्या बाहेरील मध्येप्रदेश येथील मोठ्या प्रमाणात ऊसतोड कामगार आलेले आहेत. आपल्या पोटाची खळगी भरण्यासाठी लेकरा-बाळांसह ऊस कामगारांच्या टोळ्या दाखल झाल्या आहेत. त्यांच्यासोबत काही मोठी आणि काही चिमुकलेही आहेत.

# धाराशिव बसस्थानकावर स्वच्छता व सुविधा मूल्यमापन समितीची भेट



धाराशिव हिंदूहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे स्वच्छ व सुंदर व स्थानक अभियानांतर्गत मूल्यमापन समितीने काल गुरुवारी धाराशिव बसस्थानकाला भेट दिली. यावेळी मुंबई प्रदेशच्या प्रादेशिक व्यवस्थापक चेतना खिरवाडकर, मुंबई प्रदेशचे प्रादेशिक अभियंता विवेक लोंढे, धाराशिवचे विभाग नियंत्रक अजय पाटील, प्र.विभागीय वाहतूक अधिकारी संतोष कोष्टी, धाराशिवचे आगार व्यवस्थापक बालाजी भांगे, धाराशिव आगाराचे वाहतूक निरीक्षक काझी याहीया अहेमद सुहेल अहेमद, सहा. वाहतूक अधिकारी मु.रा. कोमटवार, प्रवाशीमित्र राठींसह अन्य एसटी अधिकारी-कर्मचारी होते.

यावेळी मूल्यमापन समितीने धाराशिव बसस्थानकातील स्वच्छता, सुंदरीकरण, प्रवाशांसाठी असलेले सुलभ शौचालय, स्तनदा मातांच्या हिरकणी कक्षासह पिण्याचे पाणी, प्रवाशांना दिल्या, जाणाऱ्या ईतर सोयी सुविधांची पाहणी करून मूल्यमापन केले. स्व.बाळासाहेब ठाकरे स्वच्छ व सुंदर व बसस्थानक अभियानांतर्गत मूल्यमापन समितीकडून तपासणीचा तिसरा टप्पा सुरु आहे. धाराशिव बस स्थानकातील झालेल्या बदलाचे कौतुक करुन लांब पल्याच्या मार्गावरील कामाचे विशेष कौतुक केले.

# अवैध मद्य विरोधी कारवाई

धाराशिव (प्रतिनिधी)-पोलीस अधीक्षक श्रीमती रितू खोखर यांच्या मार्गदर्शनाखाली शुक्रवार दि.२८.११.२०२५ रोजी अवैध मद्य विरोधी धाराशिव जिल्हयात पोलीस ठाणे हद्दीत १३ कारवाया करण्यात आल्या. या छाप्यात घटनास्थळावर आढळलेले १५० लिटर गावठी दारु निर्मीतीचे गुळमिश्रीत रासायनिक द्रव, १५८ लिटर गावठी दारु व देशी विदेशी दारुच्या ७७ सिलबंद बाटल्या असे मद्य जप्त करण्यात आले. सदर जप्त मद्य यांची एकत्रीत किंमत अंदाजे ३४,१०० आहे. यावरुन महाराष्ट्र मद्य मनाई कायद्यांतर्गत संबंधीत पोलीस ठाण्यात १३ गुन्हे खालीलप्रमाणे नोंदवण्यात आले आहेत.

१)वाशी पो ठाणेच्या पथकाने ९ ठिकाणी छापे टाकले. अविनाश रा.लांजेश्वर ता. भुम जि.धाराशिव हे १९.१० वा. सु.लांजेश्वर येथील लिमकर वस्तीकडे जाणारे रोडलगत आपल्या राहत्या घराचे पाठीमागील बाजूस असलेल्या मोकळ्या जागेत अंदाजे ९६० किंमतीच्या देशी विदेशी दारुच्या १२ सिलबंद बाटल्या अवैध विक्रीच्या उद्देशाने जवळ बाळगलेल्या जप्त करण्यात आल्या. रेखा रा.लोणखस पारधी पिडी ता. वाशी जि. धाराशिव या आपल्या राहत्या घरासमोर अंदाजे १,९०० किंमतीची १८ लिटर गावठी दारु अवैध विक्रीच्या उद्देशाने जवळ बाळगलेली जप्त करण्यात आली. कालींदा रा.लोणखस पारधी पिडी ता. वाशी जि. धाराशिव या आपल्या राहत्या घरासमोर अंदाजे १,६०० किंमतीची १५ लिटर गावठी दारु अवैध विक्रीच्या उद्देशाने जवळ बाळगलेली जप्त करण्यात आली. मिरा रा.लोणखस पारधी पिडी ता. वाशी जि. धाराशिव या१०.३० वा. सु. आपल्या राहत्या घरासमोर अंदाजे १,१०० किंमतीची १० लिटर गावठी दारु अवैध विक्रीच्या उद्देशाने जवळ बाळगलेली जप्त करण्यात आली. शारदाबाई रा.सरमकुंडी ता. वाशी जि. धाराशिव या आपल्या राहत्या घरासमोर अंदाजे १३,२०० किंमतीची १५० लिटर गावठी दारु निर्मीतीचे गुळमिश्रीत रासायनिक द्रव व २५ लिटर गावठी दारु अवैध विक्रीच्या उद्देशाने जवळ बाळगलेली जप्त करण्यात आली. सारीका रा.वाशी ता. वाशी जि. धाराशिव या आपल्या राहत्या घराचे पाठीमागे अंदाजे ६,००० किंमतीची ६० लिटर गावठी दारु अवैध विक्रीच्या उद्देशाने जवळ बाळगलेली जप्त करण्यात आली. अशोक रा.सारोळा मां. ता. वाशी जि. धाराशिव हे आपल्या पानस्टॉल टपरीचे पाठीमागील बाजूस अंदाजे ७२० किंमतीच्या देशी विदेशी दारुच्या १८ सिलबंद बाटल्या अवैध विक्रीच्या उद्देशाने जवळ बाळगलेल्या जप्त करण्यात आल्या. महादेव रा.कवडेवाडी ता. वाशी जि. धाराशिव हे कवडवाडी येथील वाशी ते पारा जाणारे रोडलगत आपल्या टपरीच्या मागील बाजूस अंदाजे १,३०० किंमतीच्या देशी विदेशी दारुच्या १३ सिलबंद बाटल्या अवैध विक्रीच्या उद्देशाने जवळ बाळगलेल्या जप्त करण्यात आल्या. सुधाकर रा.सारोळा मां. ता. वाशी जि. धाराशिव हे आपल्या राहते घराचे पाठीमागे अंदाजे ७२० किंमतीच्या देशी विदेशी दारुच्या ९ सिलबंद बाटल्या अवैध विक्रीच्या उद्देशाने जवळ बाळगलेल्या जप्त करण्यात आल्या.

२)तुळजापूर पो ठाणेच्या पथकाने २ ठिकाणी छापे टाकले. हनुमंत रा. कसई ता. तुळजापूर जि.धाराशिव हे आपल्या राहत्या घरासमोर अंदाजे १,००० किंमतीची १० लिटर गावठी दारु अवैध विक्रीच्या उद्देशाने जवळ बाळगलेली जप्त करण्यात आली. सचिन रा. मंगरुळ ता. तुळजापूर जि. धाराशिव हे मंगरुळ येथे आपल्या राहते घराचे पाठीमागे अंदाजे २,००० किंमतीची २० लिटर गावठी दारु अवैध विक्रीच्या उद्देशाने जवळ बाळगलेली जप्त करण्यात आली.

३)तामलवाडी पो ठाणेच्या पथकाने १ ठिकाणी छापा टाकला. ज्ञानेश्वर रा.वडगाव काटी ता. तुळजापूर जि.धाराशिव हे तामलवाडी ते टोलनाका जाणारे सोलापूर ते तुळजापूर रोडवर वडगाव काटी रोडचे पुढे अंदाजे १,२०० किंमतीच्या देशी विदेशी दारुच्या २०सिलबंद बाटल्या अवैध विक्रीच्या उद्देशाने जवळ बाळगलेल्या जप्त करण्यात आल्या.

४)नळदुर्ग पो ठाणेच्या पथकाने १ ठिकाणी छापा टाकला. आकाश रा. आरळी खु. ता.तुळजापूर जि. धाराशिव हे १८.०० वा. सु.आरळी खु. येथे भिमनगर मध्ये जाणरे रस्त्याच्या कडेला चिंचेच्या झाडाखाली अंदाजे २,४००किंमतीची गावठी दारु व देशी विदेशी दारुच्या सिलबंद बाटल्या अवैध विक्रीच्या उद्देशाने जवळ बाळगलेल्या जप्त करण्यात आल्या.

## २,८०,७५० 'तडजोड शुल्क'वसुल

धाराशिव (प्रतिनिधी)- धाराशिव शहर वाहतुक शाखा व संबंधीत पोलीस ठाण्यांनी महत्त्वाच्या रस्त्यांवर दि.२८ नोव्हेंबर रोजी मोटार वाहन कायदा-नियम भंग प्रकरणी एकुण ३६८ कारवाया करुन २,८०,७५० 'तडजोड शुल्क'वसुल केले आहे.


लातूर समाचार धाराशिव

बातम्या,लेख व जाहिराती साठी संपर्क

9422472502

9175325708


## धाराशिव शहरातील कांही महत्वाचे फोन नंबर

१) रुग्णवाहिका २२३९७६

२) रक्तपेढी २२३९७६

३) जिल्हा रुग्णालय २२६९२७

४) शहरपोलिस स्टेशन२४०९९९

५) अग्नीशामक विभाग २२२१०१

६) रेल्वेस्टेशन २४०९९९

७) एसपी कार्यालय २२७६२०

८) जिल्हाधिकारी का.२२४५०१

९) तहसिल का. २२७८८२

१०) जि.प. २२५४०७

११)नगरपरिषद २२५४०७

१२)जिल्हा माहिती अधिकारी ०२४७२-२२२७४४

१३) जिल्हा उद्योग केंद्र (डीआयसी) ०२४७२-२२२२२६

१४) उस्मानाबाद जिल्ह्याचे उपसंचालक ०२४७२-२२७८ ९ २

१५) उप विभागीय वन कार्यालय, उस्मानाबाद ०२४७२-२२३४०८

१६)अधीक्षक उत्पादन शुल्क कार्यालय ०२४७२-२२३३८७

१७) जिल्हा कल्याण अधिकारी ०२४७२-२२२०१४

१८) प्रादेशिक परिवहन अधिकारी (आरटीओ) ०२४७२-२२२५५५

१९) मुख्य पोस्ट ऑफिस ०२४७२-२२२२१४

२०) जिल्हा रोजगार अधिकारी ०२४७२-२२२२३६

२१) विभागीय नियंत्रक (एमएसआरटीसीसी) ०२४७२-२२२२१६

२२) लातूर समाचार ९४२२४७२५०२

बीडीओ, एम.आर.ए.जी.एस. जिल्हा परिषद ०२४७२-२२०६११

२३)मुख्य कार्यकारी अधिकारी ०२४७२-२२६८४० २४)

२४) अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी ०२४७२-२५) २२३३९७ प्रकल्प संचालक ०२४७१-२२१५५२

२५) उपमुख्य कार्यकारी अधिकारी (सामान्य प्रशासन) ०२४७२-२२३३८८

२६) उपमुख्य कार्यकारी अधिकारी (ग्राम पंचायत) ०२४७२-२२३३४३

२७) उप मुख्य कार्यकारी अधिकारी (स्त्री व मुल) ०२४७२-२२२५७०

२८) मुख्य खाते व वित्त अधिकारी ०२४७२-२२२१३२

२९) शिक्षण अधिकारी (प्राथमिक) ०२४७२-२२४१८४

३०) शिक्षण अधिकारी (माध्यमिक) ०२४७२-२२४१८४

# कारकिर्दीच्या यशस्वीतेत टीम वर्क महत्वाचे -मुख्य सचिव राजेश कुमार




मुंबई, (प्रतिनिधी)- महाराष्ट्र हा माझ्या रक्तात, स्वभावात आणि आचरणात असून कोणत्याही पदावर यशस्वी होण्यासाठी माती आणि संस्कृतीशी एकरुप होणे गरजेचे आहे. आपल्या भारतीय प्रशासकीय सेवेच्या कारकिर्दीत सहकारी अधिकारी आणि कर्मचाऱ्यांसोबतचे टीम वर्क महत्त्वाचे ठरल्याची भावना मुख्य सचिव राजेश कुमार यांनी व्यक्त केली.

मुख्य सचिव राजेश कुमार ३० नोव्हेंबर २०२५ रोजी सेवानिवृत्त होत आहेत. या पार्श्वभूमीवर सामान्य प्रशासन विभागामार्फत त्यांचा सेवापूर्ती समारंभ मंत्रालयात आयोजित करण्यात आला. यावेळी सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालय अधिकारी कर्मचारी संघटना, महाराष्ट्र राज्य अनुसूचित जाती-जमाती अधिकारी कर्मचारी संघटना, महाराष्ट्र राज्य राजपत्रित अधिकारी महासंघ, आयएएस अधिकारी संघटना यांच्यावतीने त्यांना शुभेच्छा देण्यात आल्या. यावेळी राजेश कुमार यांच्या पत्नी अर्चना राजेश कुमार, अपर मुख्य सचिव राजेश अग्रवाल, अपर मुख्य सचिव ओ.पी.गुप्ता, अपर मुख्य सचिव व्ही. राधा यांच्यासह वरिष्ठ प्रशासकीय अधिकारी, मंत्रालयीन अधिकारी, कर्मचारी उपस्थित होते.

यावेळी भावना व्यक्त करताना मुख्य सचिव राजेश कुमार म्हणाले, मुख्य सचिव पदावर काम करताना आपण सर्वांना सोबत घेऊन काम करण्याचा प्रयत्न केला. ३७ वर्षांहून अधिक काळ सेवा करताना विविध विभागांमध्ये आणि शहरांमध्ये काम केले. यादरम्यान राज्याच्या कानाकोपऱ्यातील लोकांना भेटण्याचा योग आला असून हीच आपली ताकद आहे. राज्यातील प्रत्येक अधिकाऱ्याकडे क्षमता आणि अनुभव असून त्यांनी महाराष्ट्र सर्व क्षेत्रांमध्ये अग्रस्थानी नेण्यासाठी एकमेकांना सहकार्य करीत काम करावे, असे आवाहन त्यांनी केले.

अपर मुख्य सचिव राजेश अग्रवाल, मिलिंद म्हैसकर, विकास खारगे, वेणुगोपाल रेड्डी, अपर मुख्य सचिव अश्विनी भिडे, प्रशासकीय अधिकारी निपूण विनायक, सहसचिव डॉ.श्रीकांत पुलकुंडवार, अवर सचिव विठ्ठल भास्कर आदींनी यावेळी मनोगतात राजेश कुमार यांच्या कारकीर्दीचा गौरव करुन त्यांना शुभेच्छा दिल्या. सहसचिव विजय चौधरी यांनी कार्यक्रमाचे सूत्रसंचालन केले.

# सर्व सरकारी व खासगी आस्थापनांना पोश कायद्याची काटेकोर अंमलबजावणी करावी -महिला व बालविकास आयुक्त नयना गुंडे

मुंबई, महिलांवरील अत्याचार रोखण्यासाठी सर्व सरकारी विभाग, निमशासकीय संस्था तसेच खासगी आस्थापनांनी प्रिव्हेशन ऑफ सेक्शुअल हॅरेसमेंट क्ट कायद्याची काटेकोर अंमलबजावणी करणे बंधनकारक आहे. यासाठी सर्व आस्थापनांनी अंतर्गत समिती तातडीने गठीत करण्याचे आवाहन महिला व बालविकास आयुक्त नयना गुंडे यांनी केले आहे.

ज्या कार्यालये किंवा आस्थापनांमध्ये १० किंवा त्याहून अधिक कर्मचारी कार्यरत आहेत, त्यांनी अंतर्गत समिती स्थापन करणे बंधनकारक असल्याचे स्पष्ट केले आहे.

राज्यातील शासकीय, निमशासकीय कार्यालये, महामंडळे, स्थानिक स्वराज्य संस्था, शासकीय कंपनी, नगरपरिषद, तसेच शासन अथवा स्थानिक प्राधिकरणाकडून निधी प्राप्त करणाऱ्या सर्व संस्थांमध्ये अंतर्गत समिती स्थापन करावी लागणार आहे. त्याचप्रमाणे खासगी कंपन्या, उद्योग, सेवा पुरवठादार संस्था, शैक्षणिक संस्था, रुग्णालये, मनोरंजन क्षेत्रातील संस्था, क्रीडा संघटना, क्रीडा संकुले आदी सर्व खासगी आस्थापनांनाही हा नियम लागू आहे.

पोश कायद्याचे उल्लंघन केल्यास दंडात्मक कारवाई

कायद्याप्रमाणे तरतुदींचे पालन न केल्यास संबंधित आस्थापना प्रमुखास कलम २६ नुसार ५०,००० रुपयांपर्यंत दंड तसेच, उल्लंघनाची पुनरावृत्ती झाल्यास दंड दुपटीने वाढविणे, आस्थापनेचा परवाना रद्द करणे किंवा अन्य कठोर कारवाई करण्याची तरतूद आहे. अंतर्गत समितीची माहिती केंद्र सरकारच्या शी बॉक्स पोर्टलवर (िहशले,लव.सीं.ळप) अद्ययावतपणे अपलोड करावी.

तसेच नागरिक ज्या कार्यालये किंवा आस्थापनांना भेट देतील, त्या ठिकाणी अंतर्गत समितीचा फलक प्रदर्शित नसेल, तर त्याबाबत तक्रार १८१ या महिला हेल्पलाईनवर तक्रार करावी. असे आवाहनही आयुक्त नयना गुंडे यांनी केले आहे.


सांज दैनिक लातूर समाचार हे मुद्रक,प्रकाशक,संपादक व मालक दयानंद शंकर जडे, यांनी जडे ऑफसेट प्रिंटर्स, मित्रनगर, लातूर येथे छापून समर्थनगर धाराशिव येथे प्रकाशित केले आहे.

Evening Daily Latur Samachar is Published by Dayanand Shankar Jade from Samarth Nagar,Dharashiv on behalf of Dayanand Shankar Jade ,edited by Dayanand Shankar Jade and Printed by Dayanand Shankar Jade at Jade Offset Printers,Mitra Nagar,Latur. Editor : Dayanand Shankar Jade Mob:9422472502 RNI- MAHMAR/2003/11649